म. ग्रं. मं. ठाणें
विषय
सं. नं.

[redacted]भा–धुळें

श्री

रामदास आणि रामदासी

ग्रन्थमाला

भाग तेरावा

# श्रीरामदासपंथक्रमसार

REFBK-0001184

(किंमत पांच आणे)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ७.९८८

सत्कार्योत्तेजक सभा—धुळें

[ श्रीरामदास आणि रामदासी मासिक पुस्तकांत प्रसिद्ध झालेला ]

श्री

# रामदास आणि रामदासी

## भाग तेरावा

REFBK-0001184

सर दुसरा ] [ भाणि दुसरा

# श्रीरामदासपंथक्रमसार

श्रीरामसमर्थ कर्ता ह्मणतां । तोषुनि तेणें देवगुरुदाता ।
क्रमयुक्त आपुला दाऊनि पंथा । निजात्मभुवनीं नांदविती ॥

हा ग्रन्थ शंकर श्रीकृष्ण देव यांनीं धुळें येथें आपल्या
श्रीआत्माराम छापखान्यांत छापून
धुळें येथें प्रसिद्ध केला.

सर्व हक्क राखून ठेविले आहेत.

१८३७ मार्गशीर्ष वद्य ११

किंमत पांच आणे

# श्रीरामदासपंथक्रमसार

## अनुक्रमणिका


| | | | | | पृष्ठांक |
|---|---|---|---|---|---|
| प्रस्तावना | | | | | |
| | | साराचें हि सार | .... | ... | १ |
| क्रमसार | | | | | |
| समास | १ | गुरुशिष्यपण | .... | .... | १ |
| ,, | २ | मायोद्भव .... | .... | .... | ४ |
| ,, | ३ | गुरुलक्षण | .... | .... | ६ |
| ,, | ४ | शिष्यलक्षण | .... | .... | ९ |
| ,, | ५ | तनुमनधनअर्पण | ... | .... | ११ |
| ,, | ६ | प्रात:स्मरण | .... | .... | १५ |
| ,, | ७ | जप तारक | .... | .... | १७ |
| ,, | ८ | मानसपूजानमन | .... | .... | २० |
| ,, | ९ | तीर्थप्रसाद | .... | .... | २३ |
| ,, | १० | नित्यनेम .... | .... | .... | २६ |
| ,, | ११ | ज्ञान .... | .... | .... | २९ |
| ,, | १२ | ध्यान .... | .... | .... | ३१ |
| ,, | १३ | पंचीकरण | .... | .... | ३४ |
| ,, | १४ | संधानयोग | .... | .... | ३७ |
| ,, | १५ | प्रश्न .... | .... | .... | ४० |
| ,, | १६ | स्तवन .... | .... | .... | ४४ |

॥ श्रीराम ॥

# श्रीरामदासपंथक्रमसार

## प्रस्तावना

॥ श्रीराम ॥

### साराचें हि सार

म्हणाल प्रचीतीनें हें कथिलें काय ।
तरी येवढें मज पामरा कैंचें धैर्य ।
समर्थस्वामीचा हा प्रसाद होय ।
लक्ष द्या तिकडे व्हा सुखी ॥ १६—४६

" श्रीसमर्थसांप्रदायिक उपासनापद्धति" असा एकादा ग्रन्थ "श्रीरामदास आणि रामदासी " ग्रन्थमालेंत छापावा, अशी कित्येकांची सूचना असे. तें कार्य श्री आत्माराम महाराजांच्या क्रमसार ग्रन्थानें अनायासें केलें आहे. गेल्या पांच पन्नास वर्षांत उपासनापद्धतीविषयीं कोणी कोणी लिहिलेलें आढळतें, पण प्रत्यक्ष श्रीसमर्थांनीं कोणती पद्धति घालून दिली असावी, याचा आपण मुख्य विचार केला पाहिजे. नंतर ज्याला जी पद्धति रुचली ती त्यानें आपआपल्या शिष्यवर्गाला सांगितली असेल, परंतु प्रत्यक्ष श्रीसमर्थांनीं कोणता कार्यक्रम आंखून दिला असावा, हा च एक प्रश्न माझ्या मनाला मी तरी करीत आलों आहे. या प्रश्नाचें उत्तर देण्याचें मुख्य साधन म्हणजे श्रीमत् दासबोधांतील व इतर प्रकरणांतील श्रीसमर्थांची शिकवण होय, आणि दुसरें साधन म्हणजे परंपरेंतील शिष्यांनीं लिहिलेले ग्रन्थ होत. प्रस्तुतचा क्रमसार ग्रन्थ, या दुसऱ्या साधनांत बऱ्या च श्रेष्ठ प्रतीचा आहे, यांत शंका नाहीं.

हीं सर्व साधनें पाहून माझा असा निश्चय होतो कीं, उपासनापद्धतीला जें संकुचित स्वरूप आलेलें आहे तें नंतरचें होय, श्रीसमर्थांच्या वेळचें नव्हे. उपासनेचीं केवळ मूलभूत तत्त्वें श्रीसमर्थांनीं शिष्यांना शिकविलीं, त्या तत्त्वां-

चा संकोच किंवा विकास करणें हें ज्या त्या शिष्याच्या अधिकारावर राहिलें. उपासना कशी करावी हें कोणी शिकवील, पण ती कोणी किती करावी, असें कोणी बंधन घालूं शकत नाहीं. किमान पक्ष सांगतां येईल, पण त्याचा अर्थ असा नाहीं कीं, त्याहून जास्त कोणी कांहीं करूं नये. दररोज निदान मनाचे अकरा श्लोक व श्रीदासबोधाचे दोन समास वाचावेत, असें सांगतां येईल, पण एकादा प्रत्यहीं सर्व २०५ श्लोक वाचूं लागला व सबंध ग्रन्थराजाचें पारायण करूं लागला तर त्याला प्रतिबंध नाहीं. आठ प्रहरांतील निदान एक प्रहर तरी श्रीकारणीं लावीत जा, असें गुरु सांगतील, पण एकादा आठहि प्रहर लावूं लागला, तर ते त्याला नको ह्मणणार नाहींत. उपासनेला आरंभ आहे, पण शेवट नाहीं ! दिवसाचे आठ प्रहर, वर्षांचे सर्व दिवस व आयुष्याचीं सर्व वर्षें कोणी श्रीचरणसेवेंत घालविलीं, तरी तीं थोडीं च आहेत ! जन्माजन्माचे ठायीं श्रीचरणसेवा घडावी, तेथें एका जन्मांतील अल्पावधीची मातब्बरी ती किती ! क्रमसार ग्रन्थ वाचून हा माझा निश्चय दृढतर झाला आहे.

क्रमसार हा ग्रन्थ पूर्णपणें सांप्रदायिक आहे. श्रीआत्मारामहाराजांची पूर्वपरंपरा कोठें हि खंडित झालेली नाहीं.

श्रीसद्गुरुसमर्थ रामदास
|
श्री कल्याण
|
श्री शिवराम
|
श्री रामचंद्र

आणि त्यांचे श्री आत्माराम. आत्माराम महाराज मोठे साक्षात्कारी होते. त्यांच्यावर श्रीसमर्थांची पूर्ण कृपा होती. श्रीसमर्थांनीं त्यांना दर्शन दिलें त्या वेळीं त्यांचें स्वरूप कसें होतें, तें आत्माराम महाराज सांगतात:

**या सांप्रदाई गुरु दयाघन । महाराज योगी महंत पूर्ण ।**
**ब्रह्मचारी कटबंद कौपीन । पादुका शोभे पायांत ॥ १८-१९ ॥**
**संग्रहीं काठी झोळी निशाण । गुरुदत्त हुर्मुजी वरप्रावर्ण ।**
**बटवेंत असती चिजा बहुगुण । उजवे करीं तुळसीजपमाळ ॥**

डोळे मिटून क्षणभर पहा, किती मनोहर रूप दिसतें तें ! आत्मारामहाराज पुढें ह्मणतात:

**ऐसिया परीनें पडोन दृष्टी । काय प्रेरिलें कीं नेणों हृत्पुटीं ।**
**लागतां पाठीसी रूढली गोष्टी । हा वंशावळीचा ह्मणोनि ॥२१**

तेव्हां अशा अधिकारी पुरुषाचा क्रमसार ग्रन्थ किती महत्त्वाचा असला पाहिजे, हें निराळें सांगणें नको ! ग्रन्थ लहान आहे, तो सर्व सांप्रदायिकांनीं मननपूर्वक वाचून त्यापासून अवश्य तो बोध घ्यावा, अशी प्रार्थना आहे. त्या मननास साह्य व्हावें ह्मणून क्रमसाराचें हि सार देण्याचा हेतु योजिला आहे.

क्रमसाराचे एकंदर सोळा समास आहेत व विषयाच्या दृष्टीनें त्यांचे तीन भाग पाडतां येतातः ( १ ) पूर्व तयारी किंवा मुमुक्षुत्व, ( २ ) नित्य क्रम किंवा साधकावस्था व ( ३ ) कृतार्थता किंवा सिद्धावस्था. समास १ ते ५ यांत पूर्व तयारी सांगितली आहे, समास ६ ते १० यांत नित्य क्रम दिला आहे व समास ११ ते १४ यांत कृतार्थतेचें वर्णन केलें आहे. पंधराव्या समासांत सर्वसामान्य उपदेश असून सोळाव्यांत आत्माराममहाराजांनीं आपली परंपरा दिली आहे. ती परंपरा वर आली च आहे, तेव्हां आतां राहिलेल्या भागांचा क्रमशः विचार करूं.

## (१) पूर्व तयारी अथवा मुमुक्षुत्व

**अरे दुर्लभ प्राप्तीचा हा नरदेह । आयुष्य मोलाचें स्वल्प चि आहे ।**
**जाणितल्यां येथें परमार्थसोय । जन्मसार्थक होतसे ॥ ६—११**

नरदेहाची योग्यता श्रीसमर्थांनीं परोपरीनें वर्णिली आहे. जन्माचें सार्थक होण्याची शक्यता या च देहांत आहे. आहारनिद्रादि विषयोपभोग सर्व योनींत आहेत, त्यांच्यासाठीं या च देहीं विशेष अट्टाहास केला पाहिजे, असें नाहीं. या जन्मीं जर विशेष कांहीं करावयाचें असेल तर परमार्थसोय पाहिली पाहिजे. ती इतर देहीं नाहीं. हा बोध सर्व साधुसंतांनीं केला आहे व आत्मारामहाराज करीत आहेत. तो कानावरून इतक्या वेळां जातो कीं, आतां कांहीं त्याचें वाटेनासें झालें आहे ! पण हें लक्षण ठीक नव्हे ! आपण एकांतांत आपल्याशीं च विचार केला नाहीं, नरदेहाची वास्तविक योग्यता काय, तो देह आपण दवडीत आहोंत कसा, तो खरोखर कोणत्या कारणीं लाविला पाहिजे, याचा आपण आपल्या ठिकाणीं शांतपणें कधीं विचार च केला नाहीं, सारा जन्म बहिर्मुख होऊन दुश्चित्तपणें दवडिला,

तर त्याला दुसऱ्याचा काय इलाज आहे ? नरदेहीं अनुताप होणें हें तरी मोठें भाग्य होय ! फार थोड्यांच्या वाट्याला तें येतें ! बहुतेकांचा सारा जन्म जातो, पण अनुतापाचा पत्ता नसतो ! अनुताप हें जागृतीचें पूर्व चिन्ह होय ! आजपर्यंत दवडला तितका काळ पुरे झाला, आतां तरी श्रीसद्गुरु-सेवा करूं, असें ज्या दिवशीं तीव्रतरपणें मनांत येईल तो दिवस थोर भाग्याचा समजला पाहिजे !

असा अनुताप अंतरीं उपजला ह्मणजे तत्क्षणीं च श्रीसद्गुरूला अनन्य भावानें शरण रिघावें. सद्गुरु धुंडाळण्याचें वास्तविक कांहीं कारण नाहीं, मग कित्येक लोक आपली या कामीं अकारण फसगत कां करून घेतात, हें समजणें कठीण आहे. कृपण, ठक, कोपिष्ठ, धनलोभी, केवळ कर्मठ, संदेही, व्यसनी, मुक्तक्रिय, अभिमानी, अपूर्तलक्षणी, आळशी, रोगी, अन्य यातीचा, भोंदु, केवळ गोडबोलणारा, करामती जाणणारा, चोरटा, असा एकादा कोणी तरी, फारसा विचार न पहातां, गुरु करावयाचा ह्मणून, गुरु करून तोंडघशी पडण्यांत अर्थ काय ?

> **गुरुपद सर्वस्वीं होय श्रेष्ठ ।**
> **कष्टल्याविण तें न लभे कीं फुगट ।**
> **थोरीव आशास्तव ढोंग कपट ।**
> **गुरु ह्मणविती क्रिया नसतां चि ॥ ३-८ ॥**

असले गुरु, श्रीसमर्थ ह्मणतात, अडक्याचे तीन मिळाले तरी ते टाकावे ! पण कलीचा विपरीत खेळ असा कांहीं चमत्कारिक आहे कीं, अशा च गुरूंच्या नादीं लागणारे शिष्य हि फार असतात ! ठीक च आहे. लोकांना तरी साधनसायास कोठें करावयास पाहिजे असतात, सत्क्रियेचा हि त्यांना कंटाळा च आलेला असतो, शिवाय सोंग, ढोंग, व्यसन इत्यादि चाळे इतरत्र तरी कोठें चालणार, तेव्हां अशा स्वार्थी जनांना गुरु हि अनुरूप भेटावे, हा सरळ न्याय झाला ! कांहीं तरी प्रपंचविषयक कामना मनीं धरून, स्त्री, पुत्र, वतनवाडी व्हावी ह्मणून, दुखणें, बाहाणें, समंधबाधा जावी ह्मणून, निदान कांहीं नाहीं तरी रोज गोड अन्न मिळावे ह्मणून, दोन दोन दिवस एक-एका गुरुची चुणुक पाहणारे शिष्य पुष्कळ ! तथापि, हें जितकें खरें आहे तितकें च, कांहीं लोक खरोखर अत्यन्त भाविक असतात आणि भोळेपणानें फसतात, हें हि खरें आहे !

अनुताप व्हावयाचा नाहीं तो झाला, पण गुरुशोधनीं फसगत झाली, तर अर्थ एक च ! आत्मारामहाराज श्रीसद्गुरुलक्षणें सांगतात:—

**जेथें स्वधर्मकर्मी होतसे आदरु । उपासनेचा जेथें आधारु ।**
**प्रत्ययज्ञानाचा जेथें विचारु । जेथें सहित विवेक वैराग्य ॥ ३-२१**
**ज्या संगीं वागती प्रयत्न साक्षेप । सत्कळा साधनें सद्गुण अमूप ।**
**धन्य तो सर्वज्ञ महंत भूप । बहुतांस पाळिता पुण्यात्मा ॥ २२ ॥**
**न शिरे जयाचे हृदईं आशा । जनमानासाठीं न शिणे सहसा ।**
**सदा उदासी भक्तजनकोंवसा । मधुरभाषणी दयाळु ॥ २३ ॥**
**गुरुगीतादि जे जे अध्यात्मग्रंथीं । जे जे सद्गुण कथिलेती संतीं ।**
**ते ते जयाचे आंगीं शोभती । सर्वमान्य मुमुक्षा प्रिय जे ॥ २४ ॥**

हीं लक्षणें ऐकून, या सर्व लक्षणांनीं युक्त असे सद्गुरु आपणांस कसचे भेटतात ह्मणून उदास होणें नको.

**प्रगटोन नरदेहीं गुरुदयाघन । उपदेशोन तारिले-**
**आणि अद्यापि हि-**
**तारिती ॥ १-२५**

अद्यापि हि तारिती ! हें च मोठें नवल आहे !

**समाधिस्थ होऊनि आपण ।**
**नवल हो करिती प्रतिपाळण ॥ १६-२२**

अहो, एकवार श्रीसज्जनगडीं जाऊन अनन्य भावानें श्रीसमर्थसमाधीपुढें लोटांगण घाला, ह्मणजे झालें ! श्रीसमर्थांनीं च सांगितलें आहे,

**साधक भावें नमस्कार घाली । त्याची चिंता साधूस लागली ।**
**सुगमपंथें नेऊन घाली । जेथील तेथें ॥**

अनन्यगतिक होऊन त्यांना शरण जाणें एवढें च आपल्या हातचें असतें, तेवढें आपण करावें, त्यापुढची काळजी आपणांस करणें नको. तेव्हां एकवार श्रीसमर्थांना नमस्कार घालून नंतर आपण आपला विचार पाहूं.

**स्वरूपीं समरसला ह्मणोन योगी ।**
**रुचला स्वानंदु ह्मणोन भोगी ।**
**हरिला जडभ्रमु ह्मणोन त्यागी ।**
**निःसंगी निर्जी निज चि ॥ ३-२९**

कहीं न लिंपे ह्मणोन विरक्त।
स्वयें थोरावला येक महंत ।
दाता तो वोपिता स्वात्मसुखातें ।
त्या समर्थस्वामीतें नमोनमः ॥ २९

तेव्हां मला वाटतें, सद्गुरु मिळणें सोपें आहे पण आपण सच्छिष्य होणें च फार कठीण आहे. सद्गुरु कसे भेटतील ही चिंता न करतां, आपण सच्छिष्य कसे होऊं ही च विवंचना आपण केली पाहिजे.

आपण सच्छिष्य केव्हां होऊं ? श्रीसमर्थांनीं सच्छिष्यलक्षणें श्रीमद्दास-बोधांत सविस्तर दिलीं आहेत. आत्मारामहाराज त्या सर्व लक्षणांचा एका ओवींत समावेश करितातः—

विश्वासी विरक्तु गुरुदास्य आतुं ।
संसारविषंई न होय आसक्तु ।

या लक्षणांत बाकीचीं सर्व लक्षणें आलीं.

इतुक्यानें होय तो मुक्तीचा कांतु ।
सर्व हि लक्षणें मग बाणती ॥ ४—१०

( १ ) विश्वास, ( २ ) वैराग्य, ( ३ ) गुरुदास्याविषयीं आतुरता, ( ४ ) अनासक्ती, हीं सच्छिष्याचीं मुख्य चार लक्षणें होत. या चारांच्या पोटांत बाकीचीं सर्व लक्षणें आलीं, पण त्याच्या जोडीला आणखी एक पांचवें लक्षण, ( ५ ) प्रयत्न, पाहिजे, असें मला वाटतें; व याला आत्मारामहाराजांची हि संमती आहे. (११–११)

विश्वास नसेल तर, सद्गुरु महावाक्याचा जो उपदेश करतील तो पटणार नाहीं ; वैराग्य नसेल तर, जेवढें ह्मणून दृश्य आहे, ती सर्व माया आहे, हें तत्त्व मनांत बिंबणार नाहीं; सांग गुरुसेवा न घडेल तर—तर काय ? –शिष्यत्वधर्माला च आपण मुकूं; संसाराचे ठिकाणीं अनासक्ति नसेल तर, वाचाळता, अभिमान, विद्यामद हीं प्रबळ होऊन स्वानंदसाम्राज्याला आपण कायमचे आंचवूं; आणि प्रयत्न नसेल तर सद्गुरुकृपेला आपण कधीं च पात्र होणार नाहीं. हीं अशीं सच्छिष्याचीं पांच लक्षणें आहेत खरीं, पण एक च लक्षण सांगा, असें मला कोणीं विचारलें असतें तर, मी गुरुसेवा, गुरुभजन, गुरुनिष्ठा

असें एकादें एक च लक्षण सांगितलें असतें; आणि हें माझें ह्मणणें आत्मा-राममहाराजांना हि मान्य झालें नसतें, असें नाहीं. कारण ते ह्मणतात कीः

**गुरुरुपास्यः हें श्रुतिवचन। येक सद्गुरूचें करितां भजन।**
**होय शिष्य तो ब्रह्म सनातन। देखे आत्मया सर्वांतरीं ॥ ३-२५**

**गुरुसेवा** हें श्रेष्ठ लक्षण होय ह्मणून आपण त्याचा थोडासा जास्त विचार करूं. हा विचार कांहीं आपल्या पदरचा नाहीं, आत्मारामहाराजांनीं च तो दुसऱ्या समासांत सांगितला आहे.

गुरुसेवा करण्याचे चार प्रकार आहेतः-( १ ) अंगसेवा ( २ ) स्थानसेवा ( ३ ) भावसेवा, आणि ( ४ ) आत्मसेवा.

( १ ) **अंगसेवा** ह्मणजे पूजनादि प्रकारानें करावयाची ती सेवा. अशा प्रकारची सेवा प्रत्यक्ष श्रीसद्गुरूंची करण्याचें आपल्या नशिबीं नसल्यास गुरुपादुकांना च गुरुरूप मानून त्यांची सेवा करावी.

**समाधी पादुका कीं प्रसादातें।**
**प्रत्यक्ष गुरु चि मानिजे त्यातें ॥ १६-४७ ॥**

सद्गुरूंची समाधी, सद्गुरूंच्या पादुका किंवा सद्गुरूंचा तीर्थगंधयुक्त प्रसाद, हीं सर्व प्रत्यक्ष श्रीसद्गुरूंचीं च रूपें होत. त्यांची षोडशोपचारें पूजा करावी, त्यांना गंधलेपनादि उपचार करावेत, फार काय, पण सगुण मूर्तीची आपण जशी सेवा करतो, तशी सर्व सेवा, समाधी, पादुका, प्रसाद, यांची करावी. समाधी आणि पादुका यांच्या सांनिध्यांत राहण्यापुरतें हि आपलें भाग्य नसल्यास तीर्थ, गंध, पुष्प यांनीं युक्त असा प्रसाद ताइतांत किंवा लहानशा डबींत ठेवून त्याची पूजा करीत जावी.

( २ ) **स्थानसेवा** ह्मणजे श्रीसद्गुरूंच्या संबंधाचीं जीं जीं स्थानें आहेत त्यांचें दर्शन घेणें, वगैरे. जन्मस्थान जांबगांव, कर्मभूमि अखिल भरतखंड, त्यांतल्या त्यांत भरतखंडांतील तीर्थक्षेत्रें, विशेषतः महाराष्ट्र, त्यांत हि सातारा, कुलाबा, रत्नागिरी वगैरे जिल्हे, त्यांत आणखी चाफळखोरें, पाटण, मसूर, शहापुर, चरेगांव, शिवतर, हेळवाक, कळंब, अकरा मारुतींचीं स्थानें, ठिकठिकाणचे मठ, घळी, भुयारें, वगैरे, वगैरे, व विश्रांतिस्थान श्रीसज्जनगड, हीं सर्व स्थानें पहावीं, त्यांचा महिमा वर्णावा, त्या त्या ठिकाणीं जीर्ण झालेल्या कामांचा उद्धार करावा व कर-

वावा, त्या स्थानांच्या रमणीयपणांत भर घालण्यासाठीं नवीन कामें सुरू करावीं व करवावीं, त्या त्या स्थानीं जाऊन श्रीसमर्थप्रताप आठवावा, वगैरे, ही सर्व स्थानसेवा होय.

( ३ ) भावसेवा ह्मणजे मनाला श्रीसद्गुरुचरणाशिवाय दुसरा कशाचा ध्यास नसावा, अहोरात्र त्यांच्या चरित्राचें चिंतन करावें, त्यांचा प्रताप वर्णावा, लीला गाव्या, त्यांचे व त्यांच्या शिष्यप्रशिष्यांचे ग्रन्थ मिळवावे, ते निवांतपणें मननपूर्वक वाचावे, त्यांची गोडी स्वतः अनुभवावी व इतरांस लावावी, अप्रकाशित ग्रन्थ प्रकाशित करावे व प्रकाशित ग्रन्थांचा प्रसार करावा, इत्यादि सर्व भावसेवा होय.

( ४ ) आत्मसेवा ह्मणजे अभेदभावानें श्रीगुरुचरणीं अति आदरानें लपावें, तद्रूप होऊन जावें ! ही सेवा श्रेष्ठ प्रतीची होय ! ती अगदीं शेवटची, वरची पायरी होय ! तेथवर जाववेल त्यानें जावें !

असा जो एकनिष्ठ गुरुसेवक बनला त्याची थोरवी काय वर्णावी ?

**गुरुशुश्रूषीं जो निष्ठावंत ।**
**सर्व हि सिद्धि वोळती तयातें ।**
**संकट न पडे चि भक्तराजयातें ।**
**तो वर्ते उदास सर्वदा ॥ १५—२८**

यावरून एकाद्याला वाटावयाचें कीं, आरंभीं वाटला होता तितका हा सांप्रदाय कठीण नाहीं; पण तसें नाहीं. खरोखर हा पंथ कठीण आहे. ही चार प्रकारची सेवा करावयाची ह्मणजे तत्प्रीत्यर्थ तनु, मन, धन, सर्वस्व च श्रीचरणीं अर्पण केल पाहिजे.

**गुरु वदे बा हा पंथ कठीण ।**
**तनुमनधनाचें कीजे अर्पण ॥ ४-२२ ॥**

शिष्य होतो ह्मणणें सोपें आहे, पण होणें कठीण आहे. या संप्रदायाची दीक्षा घ्यावयाची ह्मणजे मंत्र घेण्यापुरती कोणाची तरी पूजा करून पुढें सवा रुपया ठेवावयाचा व निसटावयाचें असें नसून, या संप्रदायांत दक्षिणा फार मोठी पडते. ही एवढी मोठी दक्षिणा देण्याचें धैर्य पूर्व पुण्याईवांचून एकदम कोठून होणार ! तनुमनधन अर्पण केलें असें नुसतें ह्मणण्यानें तें थोडें च अर्पण होतें ! यासाठीं शिष्य ह्मणतो, आपण च, सद्गुरो

जी दयाळा काया वाचा मन ।
वळवोन सेवा घेईजे ॥ ४—२४ ॥

शिष्याची निष्ठा व भाव हीं पाहून, त्याचें धैर्य खचूं नये व त्याची उद्विग्नता नाहींशी व्हावी, ह्मणून सद्गुरु ह्मणतातः

अरे शिष्या रे तनु मन धन ।
केलेंसी नेमानें श्रीरामार्पण ।
मी माझें न ह्मणतां नातळोन मान ।
सांप्रदायक्रमउद्दिमीं निरवीं पां ॥ ५-२३

तनु, मन, धन, हीं तूं श्रीरामार्पण केलींस ना ? आतां तीं तुझीं राहिलीं नाहींत, पण यापुढें आतां तूं माझ्या आज्ञेनें त्यांचा विनियोग संप्रदायाचे कामीं करीत जा, ह्मणजे झालें ! तो विनियोग असा करः

तनु वागवी जपादि नमनसाधनीं ।
मनास मेळवीं अखंड ध्यानीं ।
धन वेंचीं पां सत्क्रियाकारणीं ।
प्रत्ययलाभानें अमर होय तूं ॥ ५-२४

बा शिष्या ! आतां शंका कसची ! श्रीसेवेंत देह झिजीव, मनानें श्रीचरणाचें अखंड ध्यान कर व सत्कार्योत्तेजक अशा कामीं धन खर्च कर ! यांत तुला कांहीं च उरलें नाहीं, असें समजूं नकोस ! गुरुकृपेचा अनुभव ही च तुझी श्रीमंती होय !

दुसरें असें पहा, शिष्या, हीं तूं सर्व श्रीचरणीं अर्पण केलींस ह्मणजे सद्गुरु कांहीं कोठें तीं घेऊन का जातात ? पुन्हां उलट तीं तुझ्या च हवालीं कारितात ! फरक इतका च कीं, अर्पण करण्यापूर्वीं तूं तीं आपलीं समजून व्यवहार करीत होतास आणि नंतर तीं सद्गुरूचीं असून त्यांनीं तीं आपल्याजवळ केवळ सद्व्यय करण्यासाठीं ठेव ह्मणून दिलीं आहेत, अशा भावनेनें तूं त्यांचा विनियोग करणार ! याचा मोठा थोरला धडा आपल्या महाराष्ट्राला श्रीसमर्थ व श्रीशिवराय या गुरुशिष्यांनीं च घालून दिला आहे ! श्रीछत्रपति शिवाजी महाराज यांनीं जेवढें राज्य मिळविलें तेवढें सारें श्रीसमर्थांच्या झोळींत घातलें ! तें काय, श्रीसमर्थांनीं ठेवून घेतलें ? नाहीं, तर असेंच्या तसें च तें त्यांना परत देऊन, याउपर हें राज्य तुमचें नसून आपलें आहे,

प्रजेचा यथान्याय सांभाळ करीत जावा आणि हें राज्य आपलें आहे याची साक्ष ह्मणून निशाणाचा रंग भगवा असावा, अशी श्रीसमर्थांनीं आज्ञा केली !

दक्षिणेचें नांव निघतां च कचरलेलें मन वरील विवेचन ऐकून पुन्हां किंचित् पुढें सरसावलें ! पण मना, तूं काय समजलास ? आधीं दचकला होतास तो कशास आणि आतां शुद्धीवर आलास ह्मणजे तरी काय ? तुला वाटत असेल, अर्पण केलें असें नुसतें ह्मणावयाचें पण ठेवावयाचें आपलें आपण च, तर ही तुझी चूक आहे. या देण्याघेण्याचें बाह्य स्वरूप तूं ह्मणतोस तसें च आहे, पण अंतर्याम मात्र वेगळें आहे. तुझें बोलणें आणि चालणें केवळ वरपंगी आहे कां अंतःकरणपूर्वक आहे, हें त्यांना चांगलें समजतें ! तथापि, मन विचारितें, नुसतें वरपंगी कां होईना, पण त्यांचें ह्मणविणें, हें हि पूर्व सुकृतावांचून होईल काय ?

> **हे गुरुवर्य मी दीन पतित ।**
> **काय होतें कीं नेणों सुकृत ।**
> **वरपांग तरी या लौकिकांत ।**
> **तुमचा ह्मणोन सांगतों ॥ १४–१**

श्रीसमर्थचरणीं तनु, मन, धन, अर्पण करणें ही कांहीं सामान्य गोष्ट नव्हे. आत्मनिवेदन ह्मणतात तें हें च होय. जड, चंचळ, निश्चळ, असे या आत्मनिवेदनाचे तीन प्रकार आहेत. ते क्रमसारांत एकएका ओवींत च दोन ठिकाणीं दिलेले आहेत [ ५–३६ व १३–६ ]; पण त्यांचीं लक्षणें समजतील अशा रीतीनें श्रीमत् दासबोधांत दिलीं आहेत तीं च येथें देणें इष्ट होय.

> **पदार्थ जड आत्मा चंचळ । विमळ ब्रह्म तें निश्चळ ।**
> **विवरोन विरे तत्काळ । तद्रूप होये ॥ १२–५–१५**
> **पदार्थ मनें काया वाचा । मी हा अवघा चि देवाचा ।**
> **जड आत्मनिवेदनाचा । विचार ऐसा ॥ १६**
> **चंचळकर्ता तो जगदीश । प्राणीमात्र त्याचा अंश ।**
> **त्याचा तो चि आपणास । ठाव नाहीं ॥ १७**
> **चंचळ आत्मनिवेदन । याचें सांगितलें लक्षण ।**
> **कर्ता देव तो आपण । कोठें चि नाहीं ॥ १८**

चंचळ चळे स्वप्नाकार । निश्चळ देव तो निराकार ।
आत्मनिवेदनाचा प्रकार । जाणिजे ऐसा ॥ १९
ठाव चि नाहीं चंचळाचा । तेथें आधीं आपण कैंचा ।
निश्चळ आत्मनिवेदनाचा । विवेक ऐसा ॥ २०
तिहीं प्रकारें आपण । नाहीं नाहीं दुजेपण ।
आपण नस्तां मीपण । नाहीं च कोठें ॥ २१

ह्या ओव्या फार महत्त्वाच्या आहेत; त्यांचा आपण आपल्या मनाशीं विचार करून त्यांचा भावार्थ पटवून घेतला पाहिजे. गुरुसेवेचें अंतिम फल ह्मणजे आत्मनिवेदन ! तें आत्मनिवेदन झालें, आत्मा येक स्वानंदघन । आणि अहमात्मा हें वचन ॥ असा प्रत्यय आला, ह्मणजे मग गुरुदास होऊन खुशाल विहरावें !

श्रीसमर्थांचा अनुग्रह व्हावा अशी इच्छा असल्यास, अशा रीतीनें तनु, मन, धन हीं त्यांच्या चरणीं तत्त्वतः अर्पण केलीं पाहिजेत. श्रीसमर्थ-समाधीची यथासांग पूजा करून व मनोभावें श्रीसमर्थांचें स्वरूप आठवून, एकवार त्यांना प्रेमभरानें दंडप्राय नमस्कार घालावा, त्यांच्या चरणीं तनुमनधन अर्पण करावें आणि त्यांचा पद्महस्त आपल्या मस्तकीं असलेला पहावा;महावाक्याचा अर्थ बिंबवून घ्यावा, ज्ञानध्यानविधि ऐकावा, तारकमंत्र श्रवण करावा व ( १ ) ना भी न करीं चिंता । ( २ ) तरसील हा क्रमु साधितां । व ( ३ ) लाहसील सेवांतीं निजरूप अवचिता । असें वरदान मिळाल्यावर च मग उठावें ! मग आपण प्रसाद सेवावा व भक्तविप्रवृंदांना वाटावा ! मग पुढें एकांतीं श्रीसमर्थांना साधनमार्ग पुसावा !

## ( २ ) नित्य क्रम किंवा साधकावस्था

विधान सर्व हि समर्थांनीं ।
वानिलेती तें तें ठेऊनि ध्यानीं ।
सप्रेमभावें नेम साधोनि ।
सार्थक जन्माचें करावें ॥ १०-१९ ॥

आत्मारामहाराज एके ठिकाणीं ह्मणतात, मनुष्यानें प्रपंच च असा करावा कीं, तो त्यास परमार्थरूप व्हावा. ह्याचें उदाहरण ह्मणजे प्रत्यक्ष

महाराष्ट्रगुरु श्रीसमर्थांचें च होय. श्रीसमर्थांनीं प्रपंच केला नाहीं हें खरें असून हि, त्यांनीं प्रपंच केला नाहीं असें ह्मणावयाचें, तर मग प्रपंच केला तरी कोणी किंवा करतो तरी कोण, हें सांगणें कठीण आहे. याचा अर्थ इतका च कीं, त्यांनीं जो परमार्थ केला तो च त्यांचा प्रपंच होता. त्यांचा प्रपंच परमार्थाला सोडून नव्हता. त्यांनीं स्वतःचा प्रपंच केला नाहीं, पण साऱ्या राष्ट्राचा प्रपंच पाहिला ! या संप्रदायाची आद्य शिकवण आहे ती ही च कीं, हा अशा तऱ्हेचा

**प्रपंच सांडून परमार्थ कराल । तेणें तुह्मी कष्टी व्हाल ।**
**प्रपंच परमार्थ चालवाल । तरी तुह्मी विवेकी ॥१२-१-२**

महाराष्ट्रांतल्या लोकांच्या ठिकाणीं हा विवेक वसत आहे आणि ह्मणून, कळत किंवा न कळत, सारा महाराष्ट्र श्रीसमर्थसांप्रदायिक आहे, असें मी नेहमीं ह्मणत असतों; असो.

श्रीसांप्रदायिकानें ही मुख्य शिकवण हृदयीं धरून आपला नित्यक्रम चालवावा. अगदीं आरंभीं मीं ह्मटलें च आहे कीं, हा नित्य क्रम साधकाला अगदीं जखडून टाकणारा केव्हां च नव्हता व नसावा. तो नुसता मार्गदर्शक असावा. तो पूर्णत्वाला नेणें हें ज्याच्या त्याच्या इच्छाबलावर अवलंबून राहणार. तो कसा असावा याचें आत्मारामहाराजांनीं जें विवेचन केलें आहे त्यावरून श्रीसमर्थकालीं महंतादिकांचा नित्यक्रम कसा होता, याची कांहींशी अटकळ होते.

सकाळीं उठल्यापासून तों रात्रीं निद्रावश होईपर्यंत श्रीसांप्रदायिकांनीं कालक्रमणा कशी करावी याविषयीं आत्मारामहाराजांची जी शिकवण आहे, ती होतां होईल तों त्यांच्या च शब्दांत येथें देतोंः

( १ ) उठते समईं होऊन जागृत । ध्यानीं आणावें गुरुरायातें ॥
( २ ) स्मरोन महावाक्य ध्यावा अर्थ ।
( ३ ) तारकमंत्र स्मरावा ।
( ४ ) आराध्यमूर्तीचें कीजे चिंतन ।
( ५ ) मग करूनि मंगळाचरण भजन ।
स्तवन कीं भूपाळ्या ह्मणाव्या ॥

( ६ ) श्रीरामजींचें सगुणध्यान । किरीट कुंडलें माळा भूषण ।
दिव्य पीतांबर वसन सुमन । मनमोहन धीर उदारु ॥
पद्मनेत्र कर पद सुहास्यवदन । तोडरादि मुद्रा वीरकंकण ।
शामळप्रभाचें बिंबतां ध्यान । तदाकार होठाती भक्त जे ॥

( ७ ) वर्णोन ससांग सगुणध्यान । सिंहासनादि पूजाविधान ।
मग देवभक्तसंतादितीर्थां वर्णून । काकडारती करावी ॥

( ८ ) नंतर कांहीं वेळानें स्नानसंध्यादि नित्यकर्मविधान सारावें.

( ९ ) मग एकांतीं, निर्वात स्थलीं किंवा मुखावरून वस्त्र घेऊन, आराध्यमूर्तीचें स्तवन करून व आपली गुरुपरंपरा आठवून, एकाग्र मनानें, मानसपूजा करीत करीत, तारकमंत्राचा जप करावा. जपाची माळ अष्टोत्तरशत तुळसीकाष्ठमण्यांची असावी. प्रत्यहीं फावल्यास एकशें तीस, किंवा निदान तेरा माळा जपाव्या. कांहीं विशेष कामाची घाई असली तर एक च माळ जपून मागाहून निवांतपणीं नित्यनेमाची भरती करावी. हा नित्यनेम झाला खरा, परंतु माळा जपत असतांना च तेवढें नामस्मरण करावयाचें असा अर्थ नसून अहोरात्र नामस्मरण चालू असावें. केव्हांच नामस्मरणाचें विसर्जन नाहीं. अशा रीतीनें तेरा कोटी जप पुरा होतां च साक्षात् अयोध्याधीश भेटतील असा श्रीसमर्थांचा आशिर्वाद आहे.

(१०) नेमजपादि सारूनि मग । देवार्चन कीजे यथानुसांग ।

(११) मग पद्धतीप्रमाणें नमन साष्टांग । कीजे गुरुदेवा अत्यादरें ॥

(१२) नमस्कारप्रियो दिवाकर । त्यासी हि नमावें प्रेमभरें ।
इतर देवांला क्रमानुसार । वंदावें स्तवनप्रेमानें ॥

(१३) तदनंतरीं स्तोत्रादि पठण । करूनि तीर्थ सेवावें ॥

अज्ञानमूलहरणं जन्मकर्मनिवारणम् ।
ज्ञानवैराग्यसिद्ध्यर्थं गुरुपादोदकं पिवेत् ॥

गुरुपादोदकाचा महिमा फार मोठा आहे. प्रत्यक्ष सद्गुरूंचा सहवास असल्यास ठीक च आहे, नाहीं पेक्षां, जें तीर्थ वाढवून जवळ ठेवलेलें असतें त्यांतील घेत जावें. पण

यापेक्षां उत्तम मार्ग ह्मणजे, मागें ह्मटल्याप्रमाणें, तीर्थगंधयुक्त श्रीचरणनिर्माल्य ताइतांत किंवा डबींत ठेवून तो ताईत किंवा डबी पूजेंत असावी व तिची पूजा करून तें तीर्थ नित्य घेत जावें. तीर्थ घेतांना महावाक्याचा त्रिवार अर्थयुक्त उच्चार करावा.

(१४) मग कांहीं वेळानें भोजन किंवा फराळ करावा. प्रोक्षिलेलें अन्न तरी निदान पानांत टाकूं नये. केव्हां हि काय, कोणता हि पदार्थ भक्षण करण्यापूर्वीं तो गुरुदेवाला अर्पण करून मग सेवावा.

(१५) तदनंतरीं स्मरत रामाला । पोषणार्थ कीजे व्यापार आपुला ॥ ज्या ज्याचा जो व्यवसाय असेल तो त्यानें सावधगिरीनें करावा. आपण प्रपंची ह्मणवितों तर प्रपंचाबरोबर इतरांकडे हि पहावें. दुःखिताचें दुःख पाहून आपण कष्टी व्हावें, शक्त्यनुसार त्याच्या दुःखाचा परिहार करावा, कोणी क्षुधित असला तर त्यास अन्नपान देऊन प्रेमळ वचनांनीं तोषवावें, कोणाच्या हि मनाला दुखवूं नये, अवघे सुखी असावे अशी वासना असावी! कोणता हि उद्योग करीत असतां श्रीरामनाम विसरूं नये.

> मग कांहीं करो कां प्रपंचकाम ।
> परि न विसंबिजे वस्तूचा अध्यासप्रेम ।
> किंवा मनांतरीं तारक नाम ।
> स्मरत धर्म कर्म सारावा ॥

अशा रीतीनें सायंकाळपर्यंतचा काळ आपआपल्या व्यवसायांत घालवावा. नंतर

(१६) सायंकाळींचे कर्म धर्म सारून । श्रीमारुतीचें घ्यावें दर्शन । स्तोत्र प्रदक्षणा नमन स्तवनें । करावें साह्य सर्वार्थी ॥ मारुतीपुढें भीमरूपी स्तोत्रें अगत्य ह्मणावीं. ह्या स्तोत्रांचा महिमा फार मोठा आहे. तीं वाटेल तेव्हां ह्मणावीं, नेहमीं च ह्मणावीं. स्नानसंध्या झाल्यावर, प्रातःकाळीं, सायंकाळीं, आनंदवेळीं, सर्वदा च तीं हृदयकमळीं धरावीं.

(१७) मग फराळ वगैरे करावा.

(१८) नंतर थोडा वेळ प्रपंच पाहून मग, उघडाची घडी परमार्थ ।
व्यापकपरीनें परोपकार । कमाईसारिखे जगदोद्धार ।
आळस अश्रद्धा करूनि दूर । नित्यनेम कीजे पंचपदी ॥
पंचपदी ह्मणजे काय ? पंचपदी ह्मणजे पुढील पांच गोष्टीः

(१) आदौ मंगळाचरणीं घ्यावें नाम । श्रीरामसमर्थ जयजयराम ।
स्तवनश्लोक ते ह्मणावे संभ्रमें । गुरुपरंपरानांव आठविजे ॥

(२) मग भजन करावें सप्रेमयुक्त ॥

(३) मग ग्रन्थ वाचावे साधीत अर्थ ॥
श्री श्लोक मनाचे, श्रीमत् दासबोध, श्रीसमर्थकृत इतर ग्रन्थ, श्रीसांप्रदायिक ग्रन्थ, हे तर वाचावेत च, परंतु भक्तिज्ञानवैराग्यपर संस्कृत प्राकृत उत्तमोत्तम सर्व ग्रन्थ, मननपूर्वक, अर्थाकडे लक्ष ठेवून वाचावेत. ग्रन्थाचा अर्थ ध्यानीं आणून अर्थरूप व्हावें. हें श्रवणमनन कांहीं करमणुकीकरितां नव्हे. त्यापासून बोध घेऊन अंतिम ध्येय प्रत्यहीं जवळ जवळ करावें. श्रवण करावें, त्याप्रमाणें क्रिया करावी ! निदान तसा प्रयत्न असावा !

(४) मग सिंहासनादि सगुणध्यान वैभव ।
सगुणनिर्गुणभजन स्तौत्य बरवें ।
धांवा मागणें प्रेमभाक सर्व ।
पदें ह्मणावीं वेगळीं ॥
करुणाष्टकें वगैरे सर्व यांत आलीं.

(५) भजन करूनि घडघडाट । कराव्या आरत्या सेजारती ॥

(१९) मग निद्रा करावी जे अकळंक ।
स्मरत सुमनानें नाम जें तारक ।
किंवा ठेऊनि तुर्याग्रीं ध्यान तें चोख ।
वस्तु होऊन निज घेईजे ॥

अशा रीतीचा आठ हि प्रहरांचा नित्यक्रम आत्मारामहाराजांनीं घालून दिला आहे. तदनुसार वर्तन करण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. अलिकडच्या परिस्थितींत पुष्कळांच्या हातून नित्यनेमाचें पालन व्हावें तसें

होत नाहीं. त्याला तशीं कारणें हि आहेत. एक तर, एकंदर समाजाची दिनचर्या च बदलली आहे; व दुसरें, परिस्थितीच्या मानानें शारीरिक व मानसिक दौर्बल्य आलें आहे त्यामुळें नित्यनेमाची जांचणी सहन होईनाशी झाली आहे. असें आहे तरी, आपण निश्चय केला पाहिजे, श्रीसमर्थवचनीं दृढ विश्वास धरला पाहिजे व त्यांची आज्ञा शिरसा मान्य करून कार्याला लागलें पाहिजे. तर च आपण त्यांचे ह्मणवावें.

## ( ३ ) कृतार्थता किंवा सिद्धावस्था

**मागें सांगितला नित्यनेम ।**
**मग सच्छिष्याप्रति गुरुपरब्रह्म ।**
**ज्ञानध्यानाचें सांगोन वर्म ।**
**कृतार्थ होई ह्मणतिलें ॥ ११-३**

श्रीगुरुचरणावर निश्चल दृष्टि ठेवून हा नित्यक्रम कांहीं काळ यथासांग, यथानुकूल, निष्कामपणें चालविला ह्मणजे योग्य वेळ पाहून सद्गुरु सच्छिष्याला महावाक्याचा ज्ञानोपदेश करून तें ज्ञान अंतरीं पूर्ण ठसण्याचा सुलभ उपाय सांगतात. हा सुगमोपाय ह्मणजे ध्यान होय. अहं ब्रह्मास्मि । हें ज्ञान झाल्यावर त्या ज्ञानस्वरूपांत च अखंड राहण्याची जी स्थिति तिला ध्यान ह्मणतात.

**गुरुमुखें कळतां मी आत्मा हें ज्ञान ।**
**तें च स्थित होतां ह्मणावें ध्यान ॥ १२-४**

यावरून ज्ञानापेक्षां हि ध्यानाची पदवी श्रेष्ठ होय, हें उघड आहे.

**श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते ।**
**ध्यानात्कर्मफलत्यागस्त्यागाच्छांतिरनंतरम् ॥** श्रीभगवद्गीता १२-१२

असें खुद्द भगवंताचें च वचन आहे.

शुद्ध अशा एकांत स्थळीं आसन घालून सर्व इंद्रियांचा उपरम करून स्वरूपाचें ध्यान करावें. आत्मारामहाराज ह्मणतात, एकदां सर्व वृत्ति स्वरूपीं समरस झाल्या ह्मणजे मग सारा पसारा नाहींसा होऊन अंतर्यामीं जे प्रकाश उमटतात ते सर्व ओलांडून पुढें जावें ह्मणजे अवर्णनीय अशा आत्मज्योतीचा साक्षात्कार होऊन स्वसंवेद्य सुखाचा प्रत्यय येईल !

तथापि इतक्या खोल पाण्यांत आपणांस जातां न आलें तरी विषाद मानावयास नको. गुरुसेवा ही च आपली पूर्वतयारी, गुरुसेवा हा च

आपला नित्यक्रम व गुरुसेवा हें च आपलें इतिकर्तव्य ! एकनिष्ठ गुरुसेवेंत काय थोडी गोडी आहे ? प्रत्यक्ष श्रीसमर्थांनीं यासंबंधानें आपल्या शिष्यांना केलेला उपदेश, परंपरेनें ऐकलेला, आत्मारामहाराज सांगत आहेत, तो ऐका, ह्मणजे आपली खात्री होईल कीं, ज्ञान, ध्यान, वैराग्य, या गोष्टी सहज च प्राप्त होणाऱ्या आहेत ! गुरुदास्य हें च सर्व साधनांचें मूळ होय !

**स्वरूपसांप्रदायी रामदासी । सद्गुरु बोधिते शिष्यजनासी ।**
**आणिक ऐका हो शिष्यपंडितांसी । कळविले मार्ग समर्थें ॥१६-१६**
**रामनाम येक चि तारकमंत्र । मठ अयोध्या साह्य कपिवर ।**
**आवाहन विसर्जन दृश्य प्रकार । सारासारविचारणा ॥ १७ ॥**
**हरि उपास्य मुद्रा अगोचरी ।**
**समाधान सिद्धआसनावरी ।**
**ज्ञान ध्यान वैराग्य कर्मणूकपरी ।**
**मूळ साधनाचें गुरुदास्य ॥ १८ ॥**

गुरुदास्याचें वर्णिलेलें हें महत्त्व पाहून पुस्तकज्ञानियांचा यावर असा एक आक्षेप येण्याचा संभव आहे कीं, कृतार्थ होण्यास वेदवेदांतादिकांचा अभ्यास करावयास नको काय ? वेदवेदांताचें श्रवणमनन नको, असें कोण ह्मणेल ? ज्याला अनुकूलता असेल त्यानें अवश्य वेदांत पहावा. आमचें ह्मणणें इतकें च आहे कीं, वेदांत पाहिला आणि गुरुकृपा नसली तर वेदांताचें रहस्य उमगणार नाहीं; पण उलटपक्षीं, गुरुकृपा असेल तर वेदांत न पाहिला तरी चालेल, कारण गुरुवचनांत सर्व वेदांत आला ! सद्गुरुकृपेचा महिमा च हा असा थोर आहे !

**नलगे सच्छिष्या करावे कष्ट । शिकोन बहु विद्या करणें खटपट ।**
**आइती च बांधावी अचाट लूट । नामधारी होउनी ॥ १५-२**
**श्रोता पुसे जी न पढोन वेदांत । केवि शिष्य तो होईल कृतकृत्य ।**
**कैसा बोधील जी आणिकातें । वक्ता समजावी यापरीं ॥ ३ ॥**
**वेद वेदांत शास्त्र पुराण । रहस्य गुरुवचनीं आहे प्रमाण ।**
**न चालितां कचाटीं सारांश साधन । सांगून करिती कृतार्थ ॥ ४ ॥**

असा हा आमचा सुलभ मार्ग आहे. तो आमरण आक्रमिल्यास साधक परपार पावेल यांत संदेह नाहीं.

सरते शेवटीं, आत्मारामहाराजांनीं केलेला सर्वसामान्य उपदेश देऊन आपण प्रस्तावनेचा उपसंहार करूं.

अहर्निशीं कीजे रामनामस्मरण।
सकळ साधनांचें फळ हें पूर्ण।
सगुणमूर्तीचें करावें पूजन।
त्यजोन कापट्य विषईक ॥ १५-१४
यथाशक्तीनें भुकेल्या अन्न।
अर्पण करावें प्रेमेंकरून।
संकट जरी असे तरी साह्य करून।
स्थळ देऊन हितगुज पुसिजे ॥ १५
सेवा करावी संतसाधूची।
प्रीति धरावी कीर्तनकथेची।
गति प्राप्त येणें अपसया चि।
आणीक सुलभ भजन हो ॥ १६
श्रीरामभजनीं असे जो तत्पर।
निश्चयेंसीं पावेल तो परपार।
सर्वसौख्यदाय मुक्तिमाहेर।
श्रीरामभजनीं विश्वासिजे ॥ १७
किंवा बैसोन येकांतीं रानामाजीं।
निरवोन मनाला गुरुपदाब्जीं।
भाकितां करुणा श्रीराम निजीं।
स्थिरवोन वृत्तीतें तारील ॥ १८
अथवा श्रीरामनाम स्मरत।
नित्य नूतन मारुती पाहात।
पूजित फिरतां षण्मासांत।
स्वहित परमार्थ फावेल ॥ १९

असा हा स्वहितपरमार्थाचा मार्ग अनुसरण्याची बुद्धि श्रीसमर्थांनीं महाराष्ट्रांतील तरुणांना द्यावी अशी प्रार्थना आहे.

## उपसंहार

क्रमसार ग्रन्थाचे कर्ते आत्मारामहाराज यांचा मठ मोगलाईंत बेदर जिल्ह्यांत येकेहाळी येथें आहे. श्रीदासविश्रामधाम या प्रचंड व प्रासादिक श्रीसमर्थचरित्राचे कर्ते ते च हे आत्मारामहाराज होत. आत्मारामहाराजांचें चरित्र व येकेहाळी मठाची हकिकत विस्तृतपणें श्रीदासविश्रामधामाच्या चवथ्या खंडाचे वेळीं प्रस्तावनेंत देण्याचें पूर्वीपासून योजिलें असल्यामुळें, येथें देणें नको.

क्रमसार ग्रन्थाच्या आह्मांस दोन प्रती मिळाल्या: एक खुद्द आत्मारामहाराजांच्या येकेहाळीमठांत व दुसरी, त्यांच्या गुरुघराण्यापाशीं, आपचंदमठांत. विपुल ग्रन्थसंपत्ति देऊन या दोन्ही मठांनीं मला आपलें कायमचें ऋणी करून ठेविलें आहे ! हें ऋण मी केव्हां आणि कसें फेडणार !

क्रमसार ग्रन्थांत रचनेचा काळ कोठें दिलेला नाहीं, परंतु खुद्द आत्मारामहाराजांचा काळ आपणांस ठाऊक असल्यामुळें व क्रमसारांत दासविश्रामधामाचा नुसता उल्लेख हि कोठें नसल्यामुळें दासविश्रामधामाच्या पूर्वीं शके १७२० च्या आंत बाहेर क्रमसार ग्रन्थाची रचना झाली असावी, असें वाटतें.

ग्रन्थ संपादण्याचें काम रा. नरहर त्रिंबक उर्फ दाजीबा देव यांनीं केलें आहे.

धुळें, १८३७ मार्गशीर्ष वद्य ११

॥ श्रीरामदासार्पणमस्तु ॥

# श्रीसद्गुरुस्तवन

## पद

राग पावक

दयाळ गुरुराया । भजे तुझिया पाया ।
तूं चि येक बापमाय । भव पार तराया ॥ ध्रु० ॥
अनंत पुण्यजोडी । देवा मज घडली ।
कायावाचामनोभावें । गोडी दृढ धरिली ॥ १ ॥
विश्वासें कृपा नाम । अहं ब्रह्म तत्त्वता ।
साधन नित्यनेम । भवनाश तत्त्वता ॥ २ ॥
भजन राघवाचें । येका भावें करूनि ।
अचुक चुकवेना । भावें वास निर्गुणीं ॥ ३ ॥
प्रपंच बाधिजेना । अंतरीं वैराग्य ।
सारासार विचारितां । जनीं होइजे योग्य ॥ ४ ॥
कोठून येणें जालें । कोठपर्यंत जाणें ।
मुळींची सोय धरितां । परब्रह्म भोगणें ॥ ५ ॥
वेर्थ चि खटपट । माया मोठी दुर्घट ।
पाहातां पाहवेना । सत्य दाविली वाट ॥ ६ ॥
उत्तीर्ण काये व्हावें । सर्व तुज अर्पिलें ।
देण्यासी नाहीं उरी । दुजें तेथें नाडळे ॥ ७ ॥
प्रालब्धीं देह टाकी । स्थूळ आहे तंवरी ।
पडो कां कोठें तरी । मुक्त तुझे विचारीं ॥ ८ ॥
**श्रीपती** ह्मण सांगे । ऐसें जया घडलें ।
तो चि येक पुण्यवंत । जन्मसार्थक केलें ॥ ९ ॥

# ॥ श्रीरामदासपंथक्रमसार ॥

॥ श्रीरामसमर्थ ॥

॥ जयजयराम ॥

श्रीरामसमर्थ कर्ता ह्मणतां । तोषूनि तेणें देवगुरुदाता ।
क्रमयुक्त आपुला दाऊनि पंथा । निजात्मभुवनीं नांदविती ॥ १ ॥

जे नांदणुकेची पाहतां रीत । फावोन स्वकरीं ये परमार्थ ।
पुढतपुढतीं होऊनि समर्थ । करिती सनाथ भाविका ॥ २ ॥

तो क्रम ऐका हो अनुक्रम । आदौ उमटावा शिष्यत्वधर्म ।
साधूनि गुरुसेवा ससांग संभ्रमें । सौख्यदाय वरदान लाहिजे ॥ ३ ॥

सस्वरूपीं रमोन अखंड । त्यजोन क्रिया ते बंडपाषांड ।
नेम क्रमसाधनीं करावे दृढ । सांगूं तो उघड संकेतीं ॥ ४ ॥

तंव श्रोतयामनीं उगवला प्रश्न । कधींहून जालें हें गुरुशिष्यपण ।
परमार्थविध कैसा निर्मिलें कोणें । वक्ता उत्तर दे ऐका ॥ ५ ॥

मुळीं ब्रह्म तें निर्विकार । गगनाहून हि सघन थोर ।
अहंस्फुरणाचा संगोच्चारें । तो चि तो जाला सर्वेश्वर ॥ ६ ॥

स्फुरणरूपें चि गुण पंचभूतें । ते चि मूळमाया कर्तृत्वहेत ।
पंचकर्णप्रमयीं पाहा निश्चित । एवं देव तो साकारला ॥ ७ ॥

सर्वं खल्विदं ब्रह्म यास्तव । भल्यानीं वदती अभिप्राव ।
तो चि तो जाला वस्तु जीवशिव । विद्या अविद्या प्रपंच ॥८॥

नानापरीचीं थाटोन शरीरें । रचोन विलोकी संसृतिजोजार ।
परि प्रभुत्वभोगातें नसती स्वतंत्र । मग योग्यवंत जाला नराकृती ॥९॥

विशेष स्फुरणानें जाला ऊर्ध्वस्थ । विषम पापानें अधता समस्त ।
पाप पुण्य समतेसंमंधी येथ । मानवदेहीं विनटला ॥ १० ॥
परि ते हि विखासी मानिलें सौख्य । भुलले नेणती स्वहितीं सार्थक ।
चिंतावला तेणें जगन्नायक । ह्मणे मज मी च नाडिलों कीं ॥ ११ ॥
कुरूपता दिसोनि ये तदा सर्व । जन्ममृत्याचें लिगटलें भेव ।
पालटितां न पालटे जडला अभाव । जेवि अवाईंत[1] पसरे दुर्वार्ता ॥ १२
जेवि आपण चि आपुलें दुखऊन अंग । उपाय करूं धावे लागवेगें ।
संतोष बहु पावे होतां चांग । तेवि जगदात्माखेळ हा ॥ १३ ॥
मग सावधानता धरून पोटीं । परतोन सद्गुळीं घातली दृष्टि ।
निर्मळला देखे निजमूर्ति गोमटी । स्वसंतोषें विनविला ॥ १४ ॥

श्लोक ॥ ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिं ।
द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्त्वमस्यादिलक्ष्यं ।
एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षिभूतं ।
भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि ॥ १ ॥

टीका करावी तरि वाढेल ग्रंथ । स्वयें चि अनुभवा आणा तो अर्थ ।
गुरुरेव परं ब्रह्म हे सत्य मात । हरिहरादि श्रेष्ठ ज्याचे कृपें ॥ १५ ॥
हें असो ऐकोनि निजार्थस्तवन । हांसोन पुसे तैं वद प्रयोजन ।
विनवी प्रबोधें निर्मळ करून । ऐक्यसें कीजे स्वरूप ॥ १६ ॥
नरदेहावांचून हें कृत्य न घडे । शिष्यपण न साजे मोक्ष न जोडे ।
अन्यत्र देहीं हा ताळा चि न पडे । तरि नरदेहीं नांदिजे निजरूपें ॥ १७ ॥
येरु ह्मणे बा कासया शिणूं । कां पाठीं लागणें स्वानंद वानूं ।
कां प्रबोधित शुद्ध अबद्ध मानूं । कां शरण येतील भ्रामिक ॥ १८ ॥
येरु प्रार्थितो देव त्रिगुणात्मा । या च कारणें कीं प्रगटणें तुह्मा ।
न कळे कवणा हि तुमचा महिमा । परि सुलभ होऊनि तारिजे ॥ १९
सहज विलोकितां कृपादृष्टीनें । जड जीवजंतु होतील पावन ।
लीळाविनोदें न येतां शरण । उद्धाराल अगत्य पडलियां ॥ २० ॥

---

1 अवाई=जनप्रवाद.

करील स्वसत्तें अघटित कार्य । यद्यपि मानवी घडेल उपाय ।
न धरितां पुरुषार्नी स्वहितसोय । नीच योन्या कल्पिलों त्यास पूर्वी ॥२१
आतां नराला उपजों अनुताप । संसारीं करीन बहु क्लेशरूप ।
सीण सीणावरी सीण अमूप । घालून करीन शरणांगत ॥ २२ ॥
करितील मूढांनीं दुःख हि सहनता । न होती मुमुक्षु न घडे सार्थकता ।
कारभार राहों द्या हा माझ्या माथा । शरणांगतासी नुपेक्षिजे ॥ २३ ॥
करूनि प्रबोधें भ्रमनिरशन । आपणऐसें कीजे कृपेनें ।
ते तुह्मी च होऊन येरा पावन । करितील पुढतीं दीप जैसे ॥ २४ ॥
ऐसें ऐकोनि सुसाध्य स्तवन । दिव्य रूप धरिलें सनातन ।
प्रगटोन नरदेहीं गुरुदयाघन । उपदेशोन तारिलें तारिती ॥ २५ ॥
ब्रह्म परात्पर सर्वेशु जीव । निर्गुण चंचळात्मा सगुणभाव ।
सद्गुरुउपासना शिष्यप्रभाव । तो चि तो जाला गुरुनाथ ॥ २६ ॥
गुरुं ब्रह्म नमाम्यहम् वचन । चंद्रशिलाप्रभाभम् चिद्रूपीं भावणें ।
द्विनेत्रं द्विभुजं गुरुम् हें स्तवन । साजे कीं अभिन्नपण यास्तव ॥२७॥
प्रबोधप्रयत्नु मायानिरास । मी तूं च ठसाऊं हा ज्ञानोपदेश ।
स्थितिवंत होणें हा साधनहव्यास । एवं क्रम सर्व विस्तारला ॥ २८ ॥
आणिक ऐका हो प्रपंचतरुफळ । भक्षितां जिवानीं शिवानीं शिक्षील ।
प्रभुत्वा प्रपंचा तेथूनि मूळ । विस्तार पुराणीं असे कथा ॥ २९ ॥
आणि सगुण देवानीं लघुत्व आपुलें । काढूं गुरु जाला पर्तोन दयाळ ।
प्रबोधून जीवा केला निर्मळ । गुरुशिष्य खेळ खेळे स्वयें ॥ ३० ॥
गुरु शिष्य उपासना साधनधर्म । ऐसिया परीनें वाढला क्रम ।
ससांग दाविलासे आत्मारामें । विलोका सप्रेमें रामायणीं ॥ ३१ ॥
इति श्रीपरमार्थक्रमसार । समर्थपंथ हा निजसौख्यकर ।
क्रियायुक्त श्रवणों होतां सादर । स्वात्मानंददाते होती स्वयें ॥ ३२ ॥
गुरुशिष्यपणनिरूपणं नाम समास प्रथम ॥ १ ॥ जयजयराम ॥

## ॥ श्रीरामसमर्थ ॥

ग्रंथारंभीं करावें स्तवन । तरि येक चि करितां रामचिंतन ।
दैवतें सकळ हि होती प्रसन्न । जेवि सिंचितां मुळासी तरु शोभे ॥१॥
कर्ता हृदयस्थु आत्माराम । इंद्रियसमुदाईं दैवतस्तोम ।
कळतां तत्कृपें निजात्मवर्म । स्मरण येक तें अखंडित ॥ २ ॥
मागील प्रसंगीं निरूपण । निजनिर्विकारीं जालें स्फुरण ।
सकळ विस्तारलें गुरुशिष्यपण । तंव केला हो प्रश्न श्रोत्यांनीं ॥ ३ ॥
निराकारीं नसे कर्तृत्वहेत । स्फुरण काशानें जालें तेथ ।
सगुण साकार हा अदृश्यवंत । माया ते मिथ्या मुळींची ॥ ४ ॥
प्रपंच मिथ्या हा देह ना देही । विकार न होये निर्गुणीं कांहीं ।
वक्ता वदे तैं भला हो तुह्मी । कोण होऊन पुसतां ॥ ५ ॥
कांहीं च नसतां कर्तृत्वहेत । कां साकारला सांगा परमिती येथ ।
प्रश्न पुसावया काय अगत्य । विचारा आपीआपणा ॥ ६ ॥
येविषईं स्फुंदती ज्ञानाभिमानी । सर्व ब्रह्म हे वदती सोपुनी ।
मुक्त आह्मी भाविती भ्रमेंजुनी । युक्तिजाळवाक्य न ऐकिजे ॥ ७ ॥
सर्व आणि ब्रह्म मी मुक्त भावणें । भ्रमिष्टा लिगटलें हें चि मूर्खपण ।
अभिन्न ज्ञाता होय सर्वज्ञ । मायामय पाठीं न लागे ॥ ८ ॥
तिकडे भाविजो ब्रह्म निर्मळ । इकडे दृश्यादि पाहें काया स्थूळ ।
तें हें भावितां स्वयें चंचळ । विस्तार सकळ तेथुनी ॥ ९ ॥
हें असो तत् त्वं तूं चि वस्तु सार । सहजस्फुरण जाणीव संगोचार ।
मायामय प्रपंचु दृश्यादि शरीर । संच विसंच केला कोणें पहा ॥१०॥
ऐसें ऐकूनियां सवर्मवचन । नमोन विनवितु कळवा खूण ।
बाप रे ब्रह्म जें सत्य सनातन । तेथें कांहीं च न साजे ॥ ११ ॥
तेथें रूपरेख ना नामादि रंग । दृष्टांत हेतु ना अंगसंग पांग ।
होतां न होतां कल्पनादि जग । जैसें चि तैसें आसत ॥ १२ ॥

विवर्तरूप तेथें स्वभाव । गुणभूतमाया चंचळ देव ।
कर्तृत्व दावी जेवि वात सर्व । सहज प्रगटोन आकाशीं ॥ १३ ॥
ह्मणाल ब्रह्मीं जें स्फुरण होत । जाणोन आपणा निजासीं दावित ।
तरि व्यापोन वायु तो बाहीर आंत । करणें पाहणें सर्व करी ॥ १४ ॥
जैसें रविकिरणीं उपजे मृगजळ । जाणत्यास कळे मृगासी सळ[1] ।
ह्मणाल त्याचेनि तें पाहवें सकळ । तरी सूर्य आत्मा जगतस्तस्थुषश्च ॥ १५
निरंजनीं होतसे झंकारध्वनि । कर्ता कोण पां तेथील धणी ।
ह्मणाल नभ वात मिश्राचेनि । तरि अंतराळा ठावा नसे कीं ॥ १६ ॥
तेवि स्वरूप तें निघोट निश्चळ । कर्ता स्फुरणात्मा मायस्थु चंचळ ।
जड संकल्पीचा हा सर्व हि खेळ । निवळतां निवळ तूं चि हे ॥ १७ ॥
जड संकल्प शून्य होतां निरशन । आपरूप निवळे कळेल तैं खूण ।
या कृतार्थ परमार्था गुरुकृपा कारण । दयावर लाहणें सेवाबळें ॥ १८ ॥
मिरवो जगीं या बोलो कुशळ । साधो कळादि विद्या वनस्थळ ।
गुरुसेवेविन्हा निस्तेज निष्फळ । व्यर्थ लौकिक संपादणें ॥ १९ ॥
निष्कामिया हें होय अवघड । कामिक भ्रांताचा कायसा पाड ।
गुरुसेवकाची धरिती हो भीड । देव ऋषि मुनि ज्ञाते भले ॥ २० ॥
न करवे तें सेवन इत्यर्थ । जेणें संतुष्टे सद्गुरुचित्त ।
प्रसंगोत्तरीं जें पडेल अगत्य । तें संपादिजे काया वाचा मनें ॥ २१ ॥
वाद्या भेद्या तो शिष्य अधम । दुःख दे उफराटें अधमाधम ।
मध्यमा सांगावें अपेक्षी उत्तम । उत्तमोत्तमु हृदय जाणे ॥ २२ ॥
किमपि न घेइजे आळस नांव । न दाविजे युक्तीनें आपुलें शाहणीव ।
सेवेनें चि सफळ तें होणें सर्व । यद्यपि स्वल्प क्रम ऐका ॥ २३ ॥
अंगसेवा ते पूजनादि पोषण । करूनि देहाला कीजे संरक्षण ।
स्थानसेवा ते उपासना पूर्ण । वाढवीजे मान स्थळाचें ॥ २४ ॥
भावसेवा ते गुरुविन्हा कांहीं । आणीक अध्यासु न जडावा हृदईं ।
आत्मसेवा ते सद्गुरुपाईं । ठेविजे भाव अभेदपणें ॥ २५ ॥

---

१ छळण. तें जल सत्य वाटून मृग तेथें धांवत जातो आणि फसतो.

न सांगतां दास्यानीं मनींची खूण । वळखोन कीजे कार्यसंपादन ।
असोन अभिन्नु सेवक होणें । तरी च वरदान पूर्ण फळे ॥ २६ ॥
प्रथम वर ना भी न करीं चिंता । दुजा तरसील हा क्रमु साधितां ।
तिजा तेव्हां कीं लाहणें अवचिता । अघटित सेवांतीं निज चि ॥२७॥
तिसरा वरदाचा विरुळा शिष्य । सहस्रामाजीं तो धन्य पुरुष ।
हें असो सर्वदा वृत्ति उदास । असतां परमार्थसिद्धि होये ॥ २८ ॥
विचारूनियां जगन्नायकें । सगट प्राण्याला होऊं सार्थक ।
संसारविभवीं निर्मिलें दुःख । न मानेल तो देवद्वेषी ॥ २९ ॥
स्मरण मरणाचें असावें मानसीं । भुलों नये हे कायामायासी ।
न पडतां वांया विभवहव्यासीं । सावध होइजे स्वहितास्तव ॥ ३० ॥
परतोन अनुतापें जो रिघेल शरण । ध्याना आणील जो विधान साधन ।
तो उत्तम अधिकारी दैववान । गुरु स्वयें होऊन सेवा करी ॥ ३१ ॥
निराधारीं जाली माया कैसी । कां जीवदशा आली ईश्वरासी ।
पुनरपि पावणें केवि प्रांतासी । कळेल गुरुवर्या भाळवितां ॥ ३२ ॥
इति श्रीक्रमसारग्रंथीं । मायोद्भवनिरूपणं नाम समास द्वितीय ॥ २ ॥

---

॥ श्रीरामसमर्थ ॥

करूनि सप्रेमें श्रीरामचिंतन । आतां करा हो येकाग्र मन ।
गुरुशिष्याचें कांहीं लक्षण । सांगून चालूं क्रमपंथ ॥ १ ॥
तंव भाविकु विनवी येकाग्र कैसें । येक्या च जिनसा झोंबे मानस ।
उत्तर दे विदित हें गुरुभक्तास । पदार्थ सन्मिश्र येक केवी ॥ २ ॥
सर्वेंद्रियाचें काम तें वर्जून । श्रवणीं च ठेवावें न चाळितां मन ।
येकाग्र वदती परि देहाभिमानें । वर्ते प्रपंच शोधित ॥ ३ ॥
ह्मणाल येकाचा स्वभाव ऐसा । काम ताठा ना कोप धन आशा ।
साध्य याचेनि च न होय सहसा । जन्ममूळ आपुलें न शोधितां ॥४॥

आदौ गुरुवर्म कळल्याविण । ऐकतां पढतां न कळे निजखूण ।
कथन पवाडीं पुण्य चि भावणें । कामिकु भ्रांत निपट चि ॥ ५ ॥
आतां प्रणव ब्रह्म तें एकाभिधान । जाणीव तुर्याग्रीं ठेविजे मन ।
अध्यांतमअर्थ तो अनुभवा आणोन । स्वरूपीं रमणें येकाग्रतें ॥ ६ ॥
विसरोन देहातें स्वपदीं ध्यास । जंवरी राहे तो येक निमिष्य ।
स्थित होणें तें आकल्प आयुष्य । आतां ऐका हो गुरुलक्षण ॥ ७ ॥
गुरुपद सर्वस्वीं होय श्रेष्ठ । कष्टल्याविण तें न लभे कीं फुगट ।
थोरीव आशास्तव ढोंग कपट । गुरु ह्मणविती क्रिया नसतां चि ॥८॥
काय येक होईना कां प्रपंचकार्य । युक्तिकथिते गुरुवाक्यवीण न होय ।
त्याचेनि न घडे कीं परमार्थसोय । करितां बहु सेवा लक्षावधीसी ॥ ९ ॥
कृपण गुरु सेखीं सांगे नास्तिक । बडाई वदत चि बुडवी ठक ।
कोपिष्ठ गुरु करी सर्वदा किटकिट । अवगुण न सोडवी धनलोभी ॥ १० ॥
संशयांत पाडी गुरु जो कर्मठु । संदेही गुरु तो करवी चावटु ।
व्यसनी आपणासा करी भ्रष्टु । मुक्त क्रियेचा धर्मकर्म उडवी ॥ ११ ॥
आश्वास चि भजे वदे अभिमानी गुरु । क्षोभ ध्यावयाला केला अधिकारु ।
अपूर्त लक्षणी तो चौकिदारु । नमों च नेदी भल्यातें ॥ १२ ॥
आपण न सांगती आळसी रोगी । आणिकास पुसतां पडती धर्गीं ।
तनुसंमंधीच्या जाचण्या वाउगी । करिती संसारी ते मनधरणी ॥ १३ ॥
अन्य यातीचा कीं भोंदु गुरु । मृदु बोलें करविती भ्रष्टाचारु ।
करामतीचा पाडी सितरु । चोर गुरु घाली पेंचांत ॥ १४ ॥
तंव श्रोता ह्मणे जी ऐका मात । चित्तास नावडती गुरु जे समर्थ ।
हीनवर्णगुरूकडे जडे प्रीत । काय गुण ते हे वर्जितां हि ॥ १५ ॥
हांसोन बोले तैं वक्ता मनीं । सत्क्रियाकंटाळ असे बहुजनीं ।
द्रव्य न खर्चिजे रमावें व्यसनीं । यालागीं मोकळे गुरु पाहती ॥ १६ ॥
अधीर जनीं या ऐसा दंडक । सोंग ढोंग विचित्र पाहतां येक ।
भ्रमेजून वदती येथें चि सौख्य । विपर्यास कळीचा खेळ हा ॥ १७ ॥

गुणशक्तिवंतु असतां स्वपुरुष । उगें चि परभ्रष्टा स्त्री होय वश्य ।
लुब्रन्यास नावडे घरान्न सरस । निषेधान्न इछी परगेहींचें ॥ १८ ॥
ज्यारिणी दंपत्या विघडी कपटें । अदखणा गुरु शिष्या घाली विपट ।
हें असो गुरुनामीचें कथन खोटें । ज्ञानहीनं गुरुं त्यजेत् ॥ १९ ॥
माय बा भटादि सतरा गुरु । यावेगळे भिडेचा गुरुप्रकारु ।
असोत हे न कथिते वैराग्यविचारु । आतां सद्गुरु तो निजज्ञानदाता ॥२०
जेथें स्वकर्मधर्मा होतसे आदरु । उपासनेचा जेथें आधारु ।
प्रत्ययज्ञानाचा जेथें विचारु । जेथें सहित विवेक वैराग्य ॥ २१ ॥
ज्या संगीं वागती प्रयत्न साक्षेप । सत्कळा साधनें सद्गुण अमूप ।
धन्य तो सर्वज्ञु महंत भूप । बहुतांस पाळिता पुण्यात्मा ॥ २२ ॥
न शिरे जयाचे हृदईं आशा । जनमानासाठीं न सिणे सहसा ।
सदा उदासी भक्तजनकोंवसा । मधुरभाषणी दयाळु ॥ २३ ॥
गुरुगीतादि जे जे अध्यात्मग्रंथीं । जे जे सद्गुण कथिलेति संतीं ।
ते ते जयाचे आंगीं शोभती । सर्वमान्य मुमुक्षा प्रिय जे ॥ २४ ॥
गुरुरुपास्यः हे श्रुतिवचन । येक सद्गुरूचें करितां भजन ।
होय शिष्य तो ब्रह्म सनातन । देखे आत्मया सर्वांतरीं ॥ २५ ॥
सर्व देव ते भाळती अपसया । ऐसी अप्रतिमा सद्गुरुदया ।
केवलं ज्ञानमूर्ति महाराजया । वानावया योग्य ते भले भले ॥ २६ ॥
ह्मणाल ज्ञानें चि चाले प्रपंच । ते संकल्प वासना आर्त विखाचें ।
जंव जाणोन आपणा होय स्थित च । तें आत्मज्ञान साच तारक ॥२७
स्वरूपीं समरसला ह्मणोन योगी । रुचला स्वानंदु ह्मणोन भोगी ।
हरिला जडभ्रमा ह्मणोन त्यागी । निःसंगी निजीं निज चि ॥ २८ ॥
कहीं न लिंपे ह्मणोन विरक्त । स्वयें थोरावला एकं महंत ।
दाता तो वोपिता **स्वात्मसुखातें** । त्या समर्थस्वामीतें नमोनमः ॥२९॥
इति श्रीक्रमसारग्रंथीं । गुरुलक्षणनिरूपणं नाम समास तृतीय ॥ ३ ॥
जयजयराम ॥

॥ श्रीरामसमर्थ ॥

श्रीगुरुरामाचे भजनबळें । मनोरथ ते पुरती सकळ ।
जेवि मित्र होतां कैलासपाळ । होय कुबेरु खजानची ॥ १ ॥
आतां शिष्याचें धन्य महिमान । सद्गुरुचरणीं ज्याचें दृढ मन ।
सकळ देवतें होतीं प्रसन्न । तो दैववान क्रमातें वाढवी ॥ २ ॥
पारंपर्यधन रक्षु होय दक्ष[1] । नैराश्यपणानें धरी सत्य पक्ष ।
खेळत ज्या संगीं फिरे मोक्ष । भासतां मुमुक्षु सिद्ध चि तो ॥ ३ ॥
येरव्हीं प्रपंचीं कामनामिसें । स्त्रीपुत्र होऊं साधूं मिरास ।
समंध सुटाया मिष्टान्नआशें । ह्मणविती शिष्य कांहीं दिन ॥ ४ ॥
थोर गुरुबंधु होऊ वश्य । दुखणें हराया भाळो पुरुष ।
नानापरीचे धरूनि हव्यास । घेती उपदेश निमित्यता ॥ ५ ॥
वानो आपणाला कीं मिळो धन । काम्यनिषेधीं गोंविती मन ।
रेंटत चि जाती गंहारपणें[2] । कपटविद्येनें भिववितो ॥ ६ ॥
पिती शौचाचें कीं धोत्रजीवन । शेण माती करिती भक्षण ।
करामत दाविती मानिती हीन । वानिती कीर्तीसी छुटावें ॥ ७ ॥
हीन प्रपंच साहा हि उद्योग । मुळीं च न जाणती कोण सन्मार्ग ।
जेवि पारधी बांधी खगाचा टांग । कीं षंढ नृपललना भाळवी ॥ ८ ॥
हें असो वीट ज्या वाटेल विभव । जो मानील वांया हे शाहणीव जाणीव ।
शुद्ध सद्गतीचा धरूनि भाव । गुरुशरण आल्याचें चिन्ह ऐका ॥ ९ ॥
विश्वासी विरक्त गुरुदास्यआर्त । संसारविषईं न होय आसक्त ।
इतुक्यानें होय तो मुक्तीचा कांतु । सर्व हि लक्षणें मग बाणती ॥ १० ॥
वक्ता वदे तैं लक्षणें बहुवसें । कथिलें ग्रंथांतरीं महापुरुषें ।
चतुःसाधनादि गुण विशेष । बहुकाळवरी साधावे ॥ ११ ॥
तरी स्वल्पीं साधेल केवि रहस्य । वक्ता वदे हो हा पुरे सारांश ।
जेवि होतां विरागें निर्मळ मानस । संन्यासपण आलें त्यांत चि ॥ १२ ॥

---

१ परंपरारूपी धन रक्षण्याच्या कामीं जो दक्ष असतो. २ गव्हार=मूर्ख.

तत् तूं चि वस्तु वदतां कृपेनें । विश्वास नसतां न बिंबे खूण ।
असंभावनेचा संशई पडोन । होय नाय भावित खालीं पडे ॥ १३ ॥
दृश्यमय माया मिथ्या वदतां । हें सत्य वाक्य न वटे विरक्ति नसतां ।
विपरीत भावनामाजिं अवचिता । गुंतोन शोधित सिणे तो ॥ १४ ॥
दृढनिश्चयोवांचूनि सर्वथा । न ह्मणावा तो परमार्थी योग्यता ।
अघटित फळप्राप्ति न होय साध्यता । गुरुसेवा सांग घडल्याविण ॥१५॥
संसारआसक्ता हें कांहीं च न घडे । भलत्या भरीनें पेंचांत सांपडे ।
वाचाळज्ञानानें अभिमान चढे । परपांगी नाडे विद्यामदें ॥ १६ ॥
नाना अवतारीं नाना राहटी । नाना प्रसंगींच्या नाना गोष्टी ।
ते श्रुतिविप्रतिपन्नता न धरून पोटीं । गुरुवचनीं च रमे सलक्षणी ॥१७॥
वाक्य काशाचें मौनी बोलणें । न दाविते ठाईं जडवी परिपूर्ण ।
हें असो गुरुशिष्यपणें अभिन्न । उभयलक्षणी तो सलक्षणी ॥ १८ ॥
तंव श्रोता पुसे हो मानून आश्चिर्य । गुरुशिष्य साबड्याची गति काय ।
अहो थेट ते सर्वस्वीं मान्ये चि होये । वरकडा आश्रय भावार्थ ॥१९॥
साबडा गुरु मिळे तैं मुळासी पाहावें । साबडा शिष्य तो धरावा भावें ।
उभयाभिमानी तो आराध्यदेव । हळु हळु प्रांता पाववी ॥ २० ॥
लाभो न लाभो कामना कामिका । लटपटी फडछे[1]या होतो आसका[2] ।
साह्य निष्कामिया श्रीरामसखा । हें असो गुरूला शिष्य विनवी ॥ २१ ॥
गुरु वदे बा हा पंथ कठीण । तनुमनधनाचें कीजे अर्पण ।
वर्तणूक करावी वचनप्रमाणें । क्रमानुसंधान राखिजे ॥ २२ ॥
जाणोन सत्क्रिया करावी राहाटी । कीर्ति वडिलाला आणावी मोठी ।
येरु विनवितो कृपेच्या पोटीं । घडवाल सर्व हि तथास्तु ॥ २३ ॥
भाळतां सत्कृपें करूं पावन । नेघतां हि ताराल नातरी सीण ।
जी दयाळा काया वाचा मन । वळवोन सेवा घेईजे ॥ २४ ॥
ईक्षोन आर्ताची शुद्धभाववृत्ति । करवोन साहित्य यथानुशक्ति ।
मंत्रघोषगजरीं मिळोन सुमतीं । मंडळपूजन करविलें ॥ २५ ॥

---

१ फडशा, नाश. २ संपूर्ण.

आराध्यमूर्तीचें कथोन ध्यान । चढऊन अक्षता करविलें नमन ।
मग करून गुरुराया आवाहन । दंडप्राय पडतां उठविलें ॥ २६ ॥
मग पादपूजांतीं तनुमनधन । दक्षणा करविलें श्रीरामार्पण ।
जालियावरी आंगपूजन । शुत्ध येकांत करविलें ॥ २७ ॥
घेऊन सन्मुखी शिष्यरायातें । न्याहळून कृपेनें श्रीदयावंतें ।
न्यासूनियां मस्तकीं पद्महस्त । दक्षणान्वयें कळविलें ॥ २८ ॥
बिंबऊनियां महावाक्यअर्थ । ज्ञानध्यानादि विधान समस्त ।
सांगोन कानीं तारकमंत्रातें । वोपिलें तरलासी ना भी वर ॥ २९ ॥
पूर्ण अनुग्रह करून तेथें । संज्ञितां जयघोष केला समस्तें ।
मग पूजोनियां पादोदकातें । तीर्थप्रसाद वाटिले ॥ ३० ॥
तदंगपूजनीं यथाविध । मानले तुष्टले भक्तविप्रवृंद ।
शिष्यासी कृपेनें वोपिले प्रसाद । भोजनादि जालें ससांग ॥ ३१ ॥
हें असो भाळतां विरक्तनाथ । मोक्षाधिकारिया नलगे विध्युक्त ।
कैसा कोठें हो हो अनुग्रहित । सर्व सफळ योग तत्समई ॥ ३२ ॥
योग्यानुसारें सांगो कां साधन । सत्फळप्राप्तीतें नाहीं भिन्न ।
हो कां गजअश्वरथादि यान । सौख्यठिकाणा पाविजे ॥ ३३ ॥

गीता श्लोक ॥ [1]ध्यानेनात्मनि पश्यंति केचिदात्मानमात्मना ।
अन्ये सांख्येन योगेन कर्मयोगेन चापरे ॥ १ ॥
अन्ये त्वेवमजानंतः श्रुत्वान्येभ्य उपासते ।
तेऽपि चातितरंत्येव मृत्युं श्रुतिपरायणाः ॥ २ ॥

इति क्रमसारग्रंथीं । शिष्यलक्षणनिरूपणं नाम समास चतुर्थ ॥ ४ ॥

॥ जय जय राम ॥

---

**॥ श्रीरामसमर्थ ॥**

श्रीरामसखयाचें दिव्य नाम । परमप्राप्तीचें सौख्यधाम ।
तेथील गुरुकृपें कळतां प्रेम । सांपडे सुगम क्रमपंथ ॥ १ ॥

---

१ श्रीमद्भगवद्गीता अध्याय १३ श्लोक २४।२५.

सत्‌शिष्य तरला मागिलाध्याई । दुसरे दिवशीं क्रमसार सर्व हि ।
कळऊं बैसोन येकांत ठाईं । पुसिलें जालास कीं बा शिष्य ॥ २ ॥
तारिलेत कीं वदे नमोन । अरे रामार्पण जालें कीं तनु मन धन ।
वदतां तथास्तु हें आपणाभिन्न । मानून वर्त पां ऐसें असे ॥ ३ ॥
तनु स्थूळ मन सूक्ष्म लिंगदेह । धन द्वयाकारण[1] कारणें[2] होय ।
जड चंचळ शून्यातें अवळोन पाहें । मी च मानोन श्रमती भवीं ॥ ४ ॥
स्वरूप आछादी कारण शून्य । लिंग वासना ते जडीं जडोन ।
योन्यांतें बहु फिरवी मानवोन तन । यातना दारुण सुटेना ॥ ५ ॥
यालागीं करविलें हें श्रीरामार्पण । देणार तो जाला सहज यासि भिन्न ।
जेवि जिव्हाळा पदार्थु वोपितां दान । तें पडितां दृष्टीला आपुलें नव्हे ॥ ६
जाणणें चि सर्व हि देणें घेणें । जाणणें ज्ञानातें जाणता धन्य ।
जेवि प्रधानीस देतां यजमानपण । स्वकार्यसंपादन होतसे ॥ ७ ॥
अरे तुर्यासाक्षी तें स्फुरण ज्ञानदेहें । टिकोनि ये स्थळीं पैलाड पाहें ।
केवळ जाणणें चि होऊन राहें । दृष्टत्वादि प्रभुत्वा सामाउनी ॥ ८ ॥
अरे तूं चि परतर परब्रह्मपुतळा । दिसतां हि देहीसा सर्वांनिराळा ।
जैसा घरधणी गृहास वेगळा । आपणास अर्पितां जाणसी हें ॥ ९ ॥

श्रुतिः ॥ **यस्यैष आत्मा वृणुते तेन लभ्यः ।**
**तस्यैष आत्मा वृणुते तनुं स्वाम्** ॥

आपण करितां आत्मनिवेदन । तनु लाभसी सच्चिदानंदघन ।
मग जीवदशाचें फिटोन दैन्य । होसील पूर्ण वस्तु चि ॥ १० ॥
परि धरून कोणाला अनुभव कीजे । कवण्या अध्यासें परपार पाविजे ।
तरि गुरुवरदनामा पात्र होइजे । सेवटा जाइजे कृपाबळें ॥ ११ ॥
या जडदेहा ठेवितां येक नांव । होतसे तेणें प्रपंच सर्व ।
तेवि गुरुपुत्र साधका दावितां भाव । तरले सावध होतु ही ॥ १२ ॥

---

१ धन हें वासनेस कारण व वासना ही स्थूल व सूक्ष्म देहास कारण; म्हणून पर्यायानें धन हें वरील दोन्ही देहास कारण. २ कारण अथवा शून्य देह.

तव नाम आत्मा हे धरीं स्मरण । सर्व हि सिध्यता घडेल येथून ।
ह्मणसील नांव काशावरून । तरि ऐक जैं आली जीवदशा ॥ १३ ॥
मातोदरीं सातवे मासीं । प्रार्थितां करुणा आली देवासी ।
सोहं उपदेश केला तयासी । येतां बाहेरी भ्रांत जाला ॥ १४ ॥
जैं परतला अनुतापें तैं देशिकानें । सोहंहंसाची कळविली खूण ।
यास चि वदती पां माया चैतन्य । प्राण जीव अजपा मूळ सर्वा ॥ १५ ॥
योगांग सुनाडिया निश्वास वदती । बैसोन ऐकतां शुध्द येकांतीं ।
सोहं हंसा हें ऐकें सुमती । हें चि महावाक्य प्रणवसार ॥ १६ ॥
सोहं वचनाचा तो मी अर्थ । उगा न बिंबे तो भाव प्रशस्थ ।
मग वरयुक्त सक्रुपें सद्गुरुनाथें । सोहं आत्मा चि तूं ह्मणतिलें ॥ १७ ॥
जडतां अध्यासीं बाणली स्थिति । ना आशंका उरली ना पुसो शक्ति।
शक्तिपात भल्यांनीं यास चि वदती । आन न दिसे चि आत्माविण ॥ १८
अंतरीं न जडतां मी आत्मा ध्यास । श्रवणसाधनादि वृथा ह्व्यास ।
वाचाळपण तें न ये कामास । वाक्यत्यागें अर्थ व्हावें स्वथा ॥ १९ ॥
श्रोता ह्मणे जी मी आत्मा मी देह । या उभयभावनीं अंतर काये ।
अहो स्वसदनीं तस्करु सिरला आहे । त्या निवारू बाहील सरकारीचा ॥ २०
दोघे हि आपणा पारिखे खरें । परि वांचविलें कीं सभ्यानीं घर ।
आणीक आतां ऐका प्रकार । सार्थका कारण हें गुरुवाक्य ॥ २१
मी आत्मा न ह्मणतां न घडे सद्गति । मी आत्मा ह्मणणें हि तनुबुद्धिसंगतीं ।
तरि संदेहसंगाची करून निवृत्ति । आत्मा च होइजे हेतुमातुविण ॥ २२
अरे शिष्या रे तनु मन धन । केलेंसी नेमानें श्रीरामार्पण ।
मी माझें न ह्मणतां नातळोन मान । सांप्रदायक्रमउदिमीं निरवीं पां ॥ २३ ॥
तनु वागवीं जपादि नमनसाधनीं । मनास मेळवीं अखंडध्यानीं ।
धन वेंचीं पां सत्क्रियाकारणीं । प्रत्ययलाभानें अमर होय तूं ॥ २४ ॥
पात्रस्थ विरक्ता देतां गोदान । गेला तो जेथील तेथें ठेऊन ।
पूर्ववत पाळितां गोरस सेऊन । नव्हे ते आपुली मान तैसें ॥ २५ ॥

श्रोता वदे जी महावाक्यउपाय । न कथिजे स्त्रीशूद्रा तरि गति काय[1] ।
अहो महावाक्यअर्थाची सांगोन सोय । स्वानुभवीं मेळविजे त्या ॥२६॥
योग्यानुसार दीनदयाळ । कथिती साधन तरि येक चि फळ ।
नाव कीं सांगडी पेटीचेनि बळें । नदी उतरोन जावें येक क्षेत्रा ॥२७॥
असो हें आतां तनु मन धन । जाळें सद्भावें श्रीरामार्पण ।
भावितील कोणी भेदाचें निरशन । केवि होय सगुणें तरि ऐका ॥२८॥
श्रीरामरूप तें ऐसें आहे । धरितां न ये तें टाकितां न जाये ।
सर्वकाळीं न दिसोन नेत्रीं राहे । भेटे अखंड देखण्याविण ॥ २९ ॥
जें वर्णितां विराले तर्क विवेक । मौन्य आश्रइला सहस्रमुख ।
सुखावोन डोले सावित्रीनायक । तन्मयीं वर्तती हरिहर ॥ ३० ॥
रामरूप निर्धारूं चालिला वेद । स्तविला बहु देवा नानाविध ।
पावोन ऐक्यता होठेला स्तब्ध । परतला ह्मणत नेति नेति ॥ ३१ ॥
मग खटपटपणाचा मानोन वीट । सर्व ब्रह्म वदे सेवटीं सगट ।
रामरूम तें केवळ घनदाट । जाणती श्रेष्ठ गुरुमुखें ॥ ३२ ॥
शुत्ध निखिल जें अखंड जाणणें । श्रीरामरूप तें सगुण निर्गुण ।
ऐक्य होय तंवरी हें हि बोलणें । निजीं निजरूप गुरुकृपा ॥ ३३ ॥
शुत्धबुत्ध तें श्रीरामरूप । जाणतां तें चि हो आपुलें स्वरूप ।
साक्षी वदे तो वेदराजभूप । तत्त्वमसि तें तूं आहेसि ॥ ३४ ॥
स रामोऽहं ऐसें जाणोन ध्यातां । भेदभावाची न उरे वार्ता ।
रामीं राम चि होऊनि स्वथा । दास्यफळ संपादी धन्य तो ॥ ३५ ॥
देवाचे चि सर्व हि जड पदार्थ । त्याची च सत्ता ते चंचळहेत ।
निश्चळीं निश्चळ देव भक्त संत । हें जड चंचळ निश्चळ निवेदन ॥३६॥
या नांव तनुमनधनाचें अर्पण । हें गुरुदास्यपणाचें फळ संपूर्ण ।
स्वयमेव आत्मा निरंजन । रामदास होऊन विहरतु ॥ ३७ ॥
इति श्रीक्रमसारग्रंथीं । तनुमनधनअर्पणं नाम समास पंचम ॥ ५ ॥

॥ जय जय राम ॥

---

१ श्रीमत् दासबोध १२-५-१६।२२ पहा.

॥ श्रीरामसमर्थ ॥

धन्य ते सद्गुरुश्रीरामकृपा । जेणें अवगत करी स्वरूपा ।
परमार्थ गमे तो अवघा सोपा । देवाधिदेव तो करुणाकरु ॥ १ ॥
गुरु परब्रह्म सत्य सनातन । धन्य अनुग्रहप्रभाव पूर्ण ।
स्वयं ब्रह्म शिष्या कारिती कृपेनें । धन्य सुखमूर्ति शुभवाणी ॥ २ ॥
धरितां सदृढ ज्याचे चरण । चुकती यातना ते जन्ममरण ।
होऊन भाविका भावनाप्रमाणें । उपदेशून साधनीं लाविती ॥ ३ ॥
दाविती स्वबोधातें येक्या उत्तरें । त्या बोधें उतरती नैश्वरभार ।
रमविती स्वरूपीं निरंतर । कारती अभिनव धन्य दाता ॥ ४ ॥
पदार्थदाते ते असती बहुत । त्यांचेनि न्हे कीं स्वरूप प्राप्त ।
मोक्षउदारिया वरदहस्तातें । उतराई किमपि न घडे चि ॥ ५ ॥
तंव श्रोता ह्मणतसे हा प्रश्न फेडा । उपदेशवाक्यार्थु दावा रोकडा ।
वक्ता उत्तर दे स्वानंदहुंडा-[1] । वरिचढा हो जाणाल ॥ ६ ॥
स्थूळादि त्रयदेहा ह्मणावा देश । तुर्या जाणीव नांव उपदेश ।
तेथें सद्भावें करावा वास । देशाश्रई उपदेश याहेतु ॥ ७ ॥
स्थूळ जीवात्मया सदन विस्तीर्ण । सान सान त्याहूनि सूक्ष्म कारण ।
अनुग्रहतनु ते ज्ञानचैतन्य । परसाध्य वस्तु नांव हें ॥ ८ ॥
अर्थ धन नामु दृश्यादि समस्त । स्वरूपअध्यासु परमार्थ सत्य ।
बोपिता स्वानंदु ह्मणूनि संत । सांप्रदाई बोलिले ॥ ९ ॥
सत्शिष्य दासाला शुश्रूषाप्रीति । येरव्हीं मूढ ते नाम घेत मरती ।
हें असो अव्हांला विख्यात कीर्ति । घेऊन सन्मुखी बोलिले ॥ १० ॥
अरे दुर्लभ प्राप्तीचा हा नरदेह । आयुष्य मोलाचें स्वल्प चि आहे ।
जाणितल्यां येथें परमार्थसोय । जन्मसार्थक होतसे ॥ ११ ॥
पाप पुण्य तें होतां समान । नरतनुप्राप्ति पावणें तेणें ।
श्रोता ह्मणे जी हें वाया चि बोलणें । ताळा न पडे चि क्रियेसी ॥ १२ ॥

---

१ स्वानंदरूपी बुरुज.

अहो सुकृत दुष्कृत गुणावरून । गुण येक नव्हे कीं तरि समानी भिन्न ।
पाप येकाचें येकाचें पुण्य । यास्तव भोगाचे फळभेद ॥ १३ ॥
मायाअध्यासें मूळपुरुष । स्त्री होय वासनाध्यासबळें ऐसें ।
विचारवंता विदित विमृष्य । शुत्धसत्व पुण्यात्मे संत साधु ॥ १४ ॥
हें असो तनु हे बहुपुण्यफळ । जरि जाणोन येथें स्वहित केलें ।
तरि चौऱ्यासी लक्ष योनीतळमळ । जन्मादि यातना चुकती ॥ १५ ॥
अरे उषःकाळ तो जाण नरदेह । घड बुद्धेंद्रियें अरुणोदय ।
भाळतां गुरु तो उदेला सूर्य । सर्वारंभासी कारण ॥ १६ ॥
प्रपंच परमार्थु दोनी विभाग । करितां न चालत्रें तो सन्मार्ग ।
करितां गुरुवर्में येक चि आंग । अहो दिनकार्य सार्थकें चि ॥ १७ ॥
उठते समईं होऊन जागृत । ध्यानीं आणावें गुरुरायातें ।
स्मरोन महावाक्य ध्यावा अर्थ । तारकमंत्र स्मरावा ॥ १८ ॥
आराध्यमूर्तीचें कीजे चिंतन । तिहीताळींचें इतुकें चि बोलणें ।
मग करूनि मंगळाचरण भजन । स्तवन कीं भूपाळ्या ह्मणाव्या ॥१९॥
श्रीरामजीचें सगुणध्यान । किरीट कुंडलें माळाभूषण ।
दिव्य पीतांबर वसन सुमन । मनमोहन धीर उदारु ॥ २० ॥
पद्मनेत्र कर पद सुहास्यवदन । तोडरादि मुद्रा वीरकंकण ।
शामळप्रभाचें बिंबतां ध्यान । तदाकार होठाती भक्त जे ॥ २१ ॥
ह्मणाल निर्गुणीं होतां अनन्य । काय प्रयोजनीं सगुणध्यान ।
अहो तें प्राप्त व्हावया मुळीं सगुण चि कारण ।
ते स्थितिलाभ टिकणें याचे बळें ॥ २२ ॥
सगुण निर्गुण परिपूर्णकाम । देवदेव तो मनोभिराम ।
ब्रह्मादिकांचें विश्रामधाम । दिव्य नाम पुरविता मनोरथ ॥ २३ ॥

श्लोक ॥ **वामे भूमिसुता पुरस्तु हनुमान्पश्चात्सुमित्रासुतौ ।**
**शत्रुघ्नो भरतश्च पार्श्वदलयोर्वायव्यकोणेषु च ।**
**सुग्रीवश्च बिभीषणश्च युवराट् तारासुतो जांबुवान् ।**
**मध्ये नीलसरोजकोमलरुचिं रामं भजे शामलम् ॥ १ ॥**

कोटि कोटि इन[1] शशी मार[2] वोवाळुनी । टाकिजे नखमुखजुटीवरूनि ।
न वर्णवे दडाल्या श्रुत्या मौनी । लावण्यविभु तो भक्तसखा ॥ २४ ॥
वर्णोन ससांग सगुणध्यान । सिंहासनादि पूजाविधान ।
मग देवभक्तसंतादितीर्था वर्णून । काकडारती करावी ॥ २५ ॥
मग कांहीं करो कां प्रपंचकाम । परि न विसंबिजे वस्तूचा[3] अध्यास प्रेम ।
किंवा मनांतरीं तारकनाम । स्मरत कर्मधर्म सारावा ॥ २६ ॥
तेणें अलिप्तता बाणेल पूर्ण । परि सार संसारीं वर्तिजे जाणून ।
अरे गुरुपुत्राचें धन्य महिमान । वर्तती प्रपंचीं साक्षित्वें ॥ २७ ॥
जाणोन सकळ हि सांप्रदायक्रम । पाहोन सुखिया मानिती संभ्रम ।
देखतां दुखिष्टा दुखती परम । शक्तिनुसार परिहारिती ॥ २८ ॥
देखोन क्षुधिस्था कळवळमनें । तोषविती प्रयत्नें अन्नपानें वचनें ।
अखंड करिती रामनामचिंतन । स्वसंधान लक्षीं ठेऊनियां ॥ २९ ॥
निर्वैरः सर्वभूतेषु वाक्य । जाणोन सर्वांतरीं आत्मा येक ।
इछिती करुणेनें सर्वांसी सौख्य । न दुखवी जनमना अर्थ हा ॥ ३० ॥
श्रोता पुसे हें विरक्तिबळ । सांग प्रपंचिका केवि घडेल ।
अहो उभयांस पाहिजे त्याग चि प्रांजळ । परि प्रसंगानुसार प्रपंचिकां[4] ॥ ३१ ॥
सबाह्य विरक्ता त्याग मुख्य । तेणें बहु होती पावन लोक ।
आपण मात्र तरे प्रपंचिक । जाणल्यास फावे सर्व कांहीं ॥ ३२ ॥
इति श्री प्रात:स्मरणनिरूपणं नाम समास षष्टम ॥ ६ ॥

---

॥ श्रीरामसमर्थ ॥

श्रीरामचंद्राय ते नमः वाक्य । स्मरतां कळिकाळा सुटे धाक ।
सांगत्या ऐकत्या होतसे सौख्य । विश्वास दृढ येक बिंबतां ॥ १ ॥
तंव चटोर श्रोत्यांनीं ह्मणे ऐका । दृढविश्वासें होतो कीं प्रपंच असका[5] ।
छी छी अरे होतु बा फुटका । भवनदीपार न पाववी ॥ २ ॥

१ सूर्य. २ मदन. ३ ब्रह्मस्वरूपाचा. ४ श्रीदासबोध ५x१०पहा. ५ असकें=सर्व, संपूर्ण.

दृढतर कोल्ह्याचें धरून पूस[1] । कोण गेला पां स्वर्गसिखरास ।
किती प्रशांशो परि प्रपंच विरस । सार्थका सार्थक परमार्थ ॥ ३ ॥
दारापुत्राचा होऊन दास । झिजे साधित धन मिरास ।
बोलणीं च साजवी मी भक्त शिष्य । वृथा हव्यास असो हें ॥ ४ ॥
मागें सांगितलें प्रातःस्मरण । मग शिष्यास गुरु वदे हो सावधान ।
स्नानसंध्यादि नित्यकर्मविधान । सारून जप कीजे ऐक कसा ॥ ५ ॥
नसे शूद्रादिका कर्मविधगोवा । त्यांनीं स्वधर्म जो तो चालवावा ।
राममंत्र तो असे बहु बरवा । वर्णाश्रमविधि बळें न इछी ॥ ६ ॥
अष्टोत्तर मण्यांची तुळसीमाळ । जपा बहु योग्य फळे सफळ ।
यदर्थीं कोणी ऐसें ह्मणेल । काष्टमणिमाळा निषेध कीं ॥ ७ ॥
तरी गौतममुनि जे प्रतापवान । बोलिले माळेचा निर्णय करून ।
तुळसीसंख्या न विद्यते वचन । पाहा फळसार संशय त्यजा ॥ ८ ॥
कितेका अखंड माळेचा भ्रम । तरि आधीं काठमण्या प्राश्चित्तार्थ धर्म ।
शत सहस्र लक्ष कोटीचा नेम । जपासी तरि मग हे युक्ति कां ॥ ९ ॥
शास्त्रजाळकुपें चि संशयो चि उठे । वादभेदउणानें संदेह थाटे ।
हें असो गुरुवचनीं स्वानंद दाटे । सारं गृण्हन्ति पंडिताः ॥ १० ॥
आतां ऐका सांबांनीं केला निर्णय । मारुतिरायाचा तो चि निश्चय ।
विधिवशिष्ठादि दाविली सोय । रामनाम तारक बहु श्रेष्ठ ॥ ११ ॥
पंचदैवताचे मिळोन थोर । सप्तकोटि वदती महामंत्र ।
देखोन फळाशा प्रपंची नर । भ्रमेजोन होती अपभ्रंशी ॥ १२ ॥

॥ श्लोक ॥ **सप्तकोटि महामंत्राः चित्तविभ्रमकारकाः ।**
**मंत्रराजमिदं प्रोक्तं राममित्यक्षरद्वयम् ॥ १ ॥**

न्यासकवचादि पुरश्चरण । न केल्या न फळती दाविती विघ्नें ।
रामनामफळें हीं दे मोक्षासी कारण । सौख्यकारक तारक सत्य हो ॥ १३ ॥
ते त्रिगुणात्मकी वरकड मंत्र । व्हावा शास्त्रींचा विध्युक्त प्रकार ।
त्रिगुणातीत हें रामनाम सार । महापातक निवारी ॥ १४ ॥

---

१ पुच्छ, शेंपूट.

रामनाम कैसें हि सौख्यदायक । सित्धारिन्नैव विद्यते वाक्य ।
आणि सृष्टीहून पूर्वीं चतुर्मुख । रासी म जोडिला तपांतीं ॥ १५ ॥
यद्यपि कामिका करून संतुष्टी । अपेक्षित सौख्यातें देऊनि सेवटीं ।
मिरवी निष्काम स्वानंदपटीं । परि गुरुमुखान्वय पाहिजे ॥ १६ ॥
रामनाममंत्र हि असती फार । त्यास हि न्यासादि पाहिजे आधार ।
स्वयें धुरंधर त्यांत निजसार । त्रयोदश मात्रा मंत्र हो ॥ १७ ॥
यास हि कोणी कर्माभिमानी । ब्राह्मण्यहटातें आणोन ध्यानीं ।
न्यास केलासे प्रणव जोडुनी । परि कांहीं च नलगे टेकणें ॥ १८ ॥
प्रणवरूप चि हा मंत्र केवळ । सित्ध्यादि साधनाविणें सफळ ।
ऐसे च विधाता जाश्वनीळ । महान्महान्साक्षी भरलेती ॥ १९ ॥
श्लोक ॥ **श्रीकारपूर्वं जयकारमध्यं । जयद्वयं नाम पुनःप्रणीतम् ।**
**त्रिःसप्तकृत्वा रघुनाथनाम । जपेन हन्याद्व्यकोटि हत्याः ॥१॥**
त्रिसप्त कृत्वा हे च अर्थवर्मगोष्टी । आतां पिंड ब्रह्मांड हे दोन कोटी ।
आत्मब्रह्महत्याची तेथ दाटी । निरसोन वस्तु चि होय जपें ॥ २० ॥
वरकड मंत्र ते पडले प्रमाणीं । हा मंत्रराज असावा अखंड ध्यानीं ।
कां वेळ गवाविजे खटलीं पडोनि । नेमांतीं हि नाहीं विसर्जन ॥२१॥
॥ श्लोक ॥ **कल्याणानां निदानं कलिमलदहनं पावनं पावनानाम् ।**
**पाथेयं यन्मुमुक्षोः सपदि परपदप्राप्तये प्रोच्यमानम् ।**
**विश्रांतिस्थानमेकं कविवरवचसां जीवनं सज्जनानाम् ।**
**बीजं धर्मद्रुमस्य प्रभवतु भवतां भूतये रामनाम ॥ १ ॥**
बत्धा या मंत्रें होय पालट । मुमुक्षु पावे बहु संतुष्ट ।
साधकासी गवसे सत्य सद्वाट । सित्धासी घट्ट बाणे स्थिति ॥ २२ ॥
चहुंदेहांची गांठी सुटोन । अहंममतेचें होऊनि निरशन ।
निश्चळीं राहतां राम चि आपण । राम ह्मणेल तो रामवर असे ॥२३॥
जप आरंभितां हि हा मंत्र तत्ध्यानें । आराध्यमूर्तीचें करूनि स्तवन ।
गुरुपारंपर्यनाम स्मरून । येकाग्रमनें जप कीजे ॥ २४ ॥
यज्ञानां जपयज्ञोऽस्मि वदे हरि । तरि तारक श्रेष्ठ हा सकळमंत्रशिरीं ।
थोरीव चि हे वानिजे मग काय थोरी । परि तो भवारि वरद व्हावा २५

ऐकोन उगे कीं पाहोन ग्रंथीं । चाळा पडिला तो अहोरात्रीं ।
पुण्य लाभे कीं होय फळप्राप्ति । गुरुवरदजपें निजें लाभे ॥ २६ ॥
तेरा सहस्र किंवा तेरा शत । नेम धरावा नित्य नित्यकृत ।
उतावेळ पडतां प्रसंगोचितें । शत जप चि कीजे पुरे ॥ २७ ॥
मागून नेमाची कीजे भरती । नेमजपाची हे कथिली रीति ।
आठवण सर्वदा ठसतां चित्तीं । स्मरण ह्मणावें नाम याचें ॥ २८ ॥
धन्य मंत्र हा जपप्रतापें । तेरा कोटीचें भरतां माप ।
साक्षात भेटे त्या अयोध्याधिप । पापतापविक्षेप नासती ॥ २९ ॥
अथवा नेमजपांतीं या मंत्रस्मरण । गुप्त चि अंतरीं कीजे दृढमनें ।
न खंडिजे न वदिजे सादृश्य होणें । मग भेटेल श्रीराम साक्षात ॥ ३० ॥
जपसमईं असावें येकाग्र मन । त्यांत चि कीजे मानसपूजन ।
तरि मुरोन मनाचें चंचळपण । पाववी निजखूण करी धन्य ॥ ३१ ॥
क्षण येक पुरे हो भक्तध्यानाला । जपरूप चि श्रीराम सगळा ।
भिन्न न भाविजे देवदासाला । आत्माराम चि मंत्रमंत्रार्थु ॥ ३२ ॥
इति श्रीक्रमसारग्रंथीं । जप तारक निरूपणं नाम समास सप्तम ॥ ७ ॥

---

॥ **श्रीरामसमर्थ** ॥

श्रीरामचंद्रा जो पातेजला । दृष्टीस नाणी इतर धर्माला ।
जेवि पाहोन नृपानीं आपुला सोहळा । न मानी चोज न परावा ॥ १ ॥
तंव पुसिलें श्रोत्यांनीं श्रीरामभक्तें । न मनावें कीं कुळादि देवांतें ।
अहो आत्माराम जो व्यापक समर्थ । तत्पदीं रत दास तो ॥ २ ॥
करितां विधानें कुळधर्मादि । न डंडळे ना जडे उपाधि ।
निखळ विरक्त तो न मानी कधीं । रामोपासनाविण आन ॥ ३ ॥
प्रपंचीक भोळे गृहस्थ त्यांहीं । श्रीराम सर्वात्मा लक्षोन हृदईं ।
कुळधर्मादि विधि करिजे सर्व हि । क्रिया वर्जून नारकी ॥ ४ ॥

१ स्वस्वरूप. २ नरकाप्रत नेणारी.

शाक्त मुक्तमार्ग तो अनर्गळ । कुकर्मसाठा क्रिया बाष्कळ ।
निंदिती भल्यांतें विषयखेळबळें । तो पंथ चि मोडावा निःशेष ॥ ५ ॥
आत्मज्ञान न ठसे व्यसनी पुरुषा । ज्ञाता न होय मद्यपी पिसा ।
या र्येक मार्गा नातळोन सहसा । येरी कुळधर्मादि कर्मा अनुसरिजे ॥ ६ ॥
हें असो सांगितला मागें जप । आतां मानसपूजेचें करूं रूप ।
तंव श्रोतयांनीं केला आक्षेप । मंत्रार्थ सांगा जी तारक ॥ ७ ॥
सद्गुरुकृपेचा ज्या लभ्य लेश । ज्याला जालासे महावाक्य उपदेश ।
मंत्रार्थअनुभऊ त्या होय वश्य । यद्यपि ऐका संकेतीं ॥ ८ ॥
श्री बीज जाणावें मंगळकारक । जयप्रदातें जय येशदायक ।
जय जय मोक्षाला देत मुक्तिसौख्य । राम परब्रह्मधाम चि ॥ ९ ॥
र अग्निबीज तें पाप संहारी । अ बीज जाणणें आत्मत्व थांवरी ।
मा मुक्तिमाता बहु सौख्यकारी । एवं मंत्रार्थ तेराक्षरी ॥ १० ॥
मोक्षसिद्धीवरी उपास्य वोळे[२] । भजक तो राम चि होऊन खेळे ।
सुखावती पुढती सत्ता चाले । भाळे गुरु भेदभ्रम हरपे ॥ ११ ॥
या जपसमई कीजे पूजा मानस । अधिष्ठानीं ठेऊनि मनास ।
स्वमूर्ति गुरुमूर्ति नाना जिनस । आसनादि साहित्य कल्पावें ॥ १२ ॥
खसखसयेवढा देव्हारावरी । अष्टदळकमळाच्या मध्यभागांतरीं ।
पूजा करावी स्वानंदगजरीं । सरंजाम उणा न होय कीं ॥ १३ ॥
मनें चि मनानें सर्व केलासे । स्थिर चि स्थूळ हा बैसला असे ।
प्रत्युन्माय तनूचा भास भासे । संकल्प वासना लिंगदेह तो ॥ १४ ॥
पूज्यपूजकासी पाहणार तेथें । संकल्प जाणीवा वळखणार सत्य ।
द्रष्टा साक्षी तो आत्मा निज नित्य । नामरूपरहित स्वयमेव तो ॥ १५ ॥
सहज सर्वदा हि जाणता तो चि । परि पष्ट उमजेना गडबडप्रपंचीं ।
तरी च फळश्रुति मानसपूजेची । बोलिले विशेष भल्यांनीं ॥ १६ ॥
नलगे आणावें वेंचावे कष्ट । आणि निजरूप ठाईं पडे पष्ट ।
जिरोन मनाचें मनपण निघोटें[३] । आत्मा च निवळ सदोदित ॥ १७ ॥

---

१ स्थिर करी, सांभाळी. २ प्राप्त होतो, प्रसन्न होतो. ३ परिपूर्ण.

मानसपुजेचें हें महिमान । प्रत्यक्ष पूजेचें फळ कोटिगुणें ।
मानसपूजेचा ग्रंथीं विधान । बोलिलेति दासांनीं विलोका ॥ १८ ॥
गुरुमूर्ति कीं उपासनामूर्ति भावणें । किंवा प्रपंचाचे पदार्थ कल्पणें ।
मन चि करी दोनी परि विशेष कारण । उपास्यबळें सिद्धि सत्कार्य ॥१९॥
येक गुरुपाईं जडतां प्रीति । गोळा च होय ते प्रपंचवृत्ति ।
या ममतेनें भ्रांतीतें होऊन समाप्ति । बाणे निजस्थिति सगुणें चि ॥२०॥
सगुणीं च आहे हो तरणउपाय । सगुणीं च सत्सोयतमासा आहे ।
सगुणीं च सांपडे परमार्थसोय । निर्गुणपद लाहे भेद हरे ॥ २१ ॥
हें कळलें श्रोता तो आणिक विनवी । जी जपमानसपूजासमईं ।
बैसलें असतां हि येकांत ठाईं । कां मुखवस्त्र घेती फळ कोणतें ॥२२॥
वक्ता वदे हो मुसकटांत फळ । असल्यास भल्यांनीं अंगिकारिलें ।
पसरून जप करितां नेत्रकमळ । मन चंचळे वातादि दशनगुणें ॥२३॥

कोणी बोलतां बोलावें लागतें ।
झांकोन घेतां निश्चित निवांत ।
ध्यान थोर तें न व्हावें पदार्थमिश्रित ।
लाऊनियां लोचन करावें रामाचें ध्यान ॥ २४ ॥

डोळे झांकितां प्रेम होय अधिक । जाणणें चि उरे तैं निज निष्कळंक ।
आणि अंतर्यामीं विधानपूर्वक । पूजितां मन करी चंचळता ॥ २५ ॥
दापितां मनाला कथित बुद्धि । उमटे तोषादि मुखारविंदीं ।
हें कळों नेदावें हो आणिक विधि । मुखवस्त्र लाऊन ध्यान करितां ॥२६॥
तें मुख प्रिय वाटे भाविक जनाला । प्रसन्नवाक्य तें दावी सोहळा ।
तंव वाचाळज्ञान्यानीं पुसता जाला । ब्रह्म चि ब्रह्म कां हे खटपट ॥२७॥

ब्रह्म चि ब्रह्म तरि कां सौख्य शोधिता ।
भोजनभूषणादि विख सज्ज करिता ।
तनुपक्षभ्रांति असो हें आतां ।
सिद्धत्वावरी शोभे साधन ॥ २८ ॥

मानसपूजेला नाहीं फुरसत । तरि ध्यावी आयती मूर्ति पूजित ।
कोणतीं साधनें हो संकटांत । बीज राखावें प्रेमबळें ॥ २९ ॥
नेमजपादि सारूनि मग । देवार्चन कीजे यथानुसांग ।
मग पद्धतिप्रमाणें नमन साष्टांग । कीजे गुरुदेवा अत्यादरें ॥ ३० ॥
नमस्कारप्रियो दिवाकर । त्यासी हि नमावें प्रेमभरें ।
इतर देवांला क्रमानुसार । वंदावें स्तवनप्रेमानें ॥ ३१ ॥

श्लोक ॥ **शंकरः शेषशायी च मार्तंडो मारुतिस्तथा ।**
**एतेषां दर्शनं पुण्यं नित्यनेमे विशेषतः** ॥ ५ ॥

नमस्कार तेरा करितां भावें । तेणें तुष्टती सकळ हि देव ।
मग स्तोत्रपारायण कीजे बरवें । स्वात्माराम तुष्टविजे ॥ ३२ ॥
इति श्रीक्रमसारग्रंथीं मानसपूजानमननिरूपणं नाम समास अष्टम ॥८॥
जय जय राम ॥

---

॥ **श्रीरामसमर्थ** ॥

जय जया जी श्रीरामचंद्रा । जय मोक्षपाणी करुणाकरा ।
दमिता षड्रिपु दीनोत्धारा । मिरवा स्वबोधा भूषउनी ॥ १ ॥
मागिलाध्याईं जालें कथन । मानसपूजा नमनलक्षण ।
तदनंतरीं स्तोत्रादि पठण । करूनि तीर्थ सेवावें ॥ २ ॥
प्रत्यक्ष गुरु तरी प्रत्यक्ष तीर्थ । नातरी वाढविलें जें करूनि सांचित ।
कीं ताइत असे जो तीर्थगंधयुक्त । पूजोन काढिलें तें घ्यावें ॥ ३ ॥

॥ श्लोक ॥ **अज्ञानमूलहरणं जन्मकर्मनिवारणम् ।**
**ज्ञानवैराग्यसिद्ध्यर्थं गुरुपादोदकं पिबेत्** ॥ १ ॥

अज्ञानाचें मूळ भ्रमरूप । जडअध्यासें होतसे अल्प ।
भाविका गुरुपादतीर्थप्रताप । भेदशून्यकल्पना निवारी ॥ ४ ॥
कायामायादि दृश्य पदार्थ । मी माझें जन्मा हें कारणीभूत ।
निरसोन तेणें वासनादि हेत । संसृतिकिंत हारपे ॥ ५ ॥
तो चि मी आत्मा उमटे ज्ञान । कहीं न लिंपे वैराग्य उमजोन ॥
होऊन स्वसाक्षी रमे परिपूर्ण । तीर्थमाहिमान धन्य हें ॥ ६ ॥

अज्ञानमूळातें नाशी ज्ञान । जन्मकर्मा वैराग्य करी निर्शन ॥
समुद्रवळयांकित तीर्थफळ जेणें । लाभोन होणें तीर्थरूप ॥ ७ ॥

॥ श्लोक ॥ **सप्तसागरपर्यंतं तीर्थस्नानेन यत्फलम् ।**
**गुरोरंघ्रिबिंदुजलं तत्फलं प्रददाति हि ॥ १ ॥**

गुरुपादबिंदु तो क्षीरसिंधु । सकळक्षेत्रराजा पदारविंदु ॥
कासीप्रयागादि करिती सन्निधु । गुरुचरणामृततीर्थासी ॥ ८ ॥
तरति दुष्कृतानि हें श्रुतिवचन । असो हे तीर्थातें करूनि सेवन ।
सोहं आत्मा हें उच्चारण । कीजे त्रिवार अर्थयुक्त ॥ ९ ॥
सेऊन आधीं देवतीर्थातें । मागून घेती गुरुचरणतीर्थ ।
तरि प्रशस्थ गुरुतीर्थें होऊन पुनीत । मागून मानिजे उपासना ॥१०॥

श्लोक ॥ **गुरुभावः परं तीर्थमन्यतीर्थं निरर्थकम् ।**
**सर्वतीर्थफलं देवि तत्पादाब्जे च वर्तते ॥ १ ॥**

न वानवे तीर्थाचा महिमा थोर । होय सद्भाविका फलत्कार ।
सेऊनिया मग होऊनि सादर । करावें भोजन किं फराळ ॥ ११ ॥
आराध्यदेवा दाऊन नैवेद्य । विवरोन जेवावें जाणत सुस्वाद ।
भोक्ता कोण हा ध्यावा शोध । होय प्रसाद गुरुध्यानें ॥ १२ ॥

॥ श्लोक ॥ **अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमाश्रितः ॥**
**प्राणापानसमायुक्तः पचाम्यन्नं चतुर्विधं ॥ १ ॥**

श्रुतिः ॥ हरिर्दाता हरिर्भोक्ता ॥

भोक्ता श्रीराम जनार्दन । सकळ योगाचें मूळ चि अन्न ॥
व्रतपर्वतीर्थाचें सफळ होणें । कीर्तिवान् भवति वाक्य असे ॥ १३ ॥
प्रसादमहिमेचें कळतां कौतुक । जन्ममरणाचीं निरसती दुःखें ॥
भुक्त्वा गुरुप्रसादजं वाक्य । न मानितील मूर्ख होय ते ॥ १४ ॥
सिष्यवर्ग पुत्र ते कन्या नारी । पात्रोच्छिष्टाचे हे अधिकारी ।
निर्णय खचित तो आहे शास्त्रीं । परि भावना चि येथें कारण ॥१५॥
जेवि मौंजीबंधनाधीं मात्रोच्छिष्ट । तेवि उपदेशांतीं गुरुप्रसाद श्रेष्ठ ॥
प्रसादादिकाचें वचन गोमटें । फळत चि जाये पुढतपुढती ॥ १६ ॥

॥ श्लोक ॥ मात्रुच्छिष्टं गुरूच्छिष्टं यद्वन्मधु पयस्तथा ॥
एते ग्राह्या न दुष्यंति व्यासस्य वचनं तथा ॥ १ ॥

परि गुरुमुखें कळावें प्रसादवर्म । नातरी भलते चि खवळती काम ।
अहो लाभला जयाला प्रसादप्रेम । युक्त कर्म करील तो गुरुपुत्र ॥१७॥
सार्थक चि त्याचें कर्म जें करणें । सेतपोत उदिमी दळण कांडणें ।
शौच्यासी जाण उदकादि आणणें । प्रसादा कारण भासे त्या ॥ १८ ॥
यापरी अंतरीं जडतां निष्ठा । परमार्थलाभा मग काय तोटा ।
आपुली हो परावी हो क्षुधेसी मोठा । मान देऊनि सांभाळिजे ॥१९॥
अन्नस्य क्षुधितं पात्रं वाक्य । येविषईं पात्र ना उणा अधिक ।
मुख्य गुरुदासें कीजेल कर्म धर्म चोख । कीर्तीस कारण नेम दीक्षा ॥
न टाकावें हो पात्रीचें अन्न । सांडी कराया नसे प्रमाण ।
सुमार न कळतां कीं घालितां बळानें । सावरिजे प्रोक्षिलें तेवढें तरी ॥
अंतरात्मा न वदे कडु कीं गोड । प्राणादिका नसे कीं रुचीची चाड ।
क्षुधा करी धरी प्राण अन्न कोड । वोढी उदान सेविलें तें ॥ २२ ॥
समान कांहीं हो करी सगटसरी । अपान मळातें घाली बाहेरी ।
व्यान वायु तो रसनें झडकरी । सर्वांगा सरी पोहंचावया ॥ २३ ॥
कांहीं अग्नी तो करी भस्म । आतां धरून देहाशा रुचि मायाभ्रम ।
वावरतो त्याला करूनि निष्काम । परमार्थ परम साधिजे ॥ २४ ॥
अन्नं न निंद्यात् याचा अर्थ । गुरुमुखें उमजावा गहन बहुत ।
गोमुखादि कांहीं धरितां व्रत । नवसफळ तेवढें पावती ॥ २५ ॥
निर्मोन सकष्टें अन्न जें उचित । अर्पण तें कीजे हृदयस्थांत ।
हे असो काही हो भक्षितां पदार्थ । तंव गुरुदेवार्पित हें स्मरावें ॥२६॥
तदनंतरीं अंतरीं स्मरत रामाला । पोषणार्थ कीजे व्यापार आपुला ।
सादर ही असोन सत्संगतीला । श्रवण मनन करावें ॥ २७ ॥
तंव श्रोता ह्मणे हें बिंबलें हृदईं । विटाळ क्षयवृद्धि येतां कांहीं ।
निष्काम नेम हा त्याग किमपी ही । न कीजे कैसा परिणाम ॥ २८ ॥

अहो विरक्त पुरुषा हे पुसणें चि नलगे ।
लौकिक प्रपंचिका राखणें चि श्लाघ्य ।
आणि शास्त्रमर्यादा ही रक्षावे लागे ।
तरि स्थूळानें होतें तें वर्जावें ॥ २९ ॥
नमन साष्टांग जपमाळ जप । तीर्थादि पूजा देवासमीप ।
हें त्यागोन अंतरीं नेम सुखरूप । करून रक्षावी अंतरस्थिती ॥ ३० ॥
मानसपूजा जप ज्ञान ध्यान । अंतरीं च अंतरीं कीजे प्रीतीनें ।
आणि तीर्थप्रसाद ही कीजे सेवन । दुसऱ्याकडोन पावल्या ॥ ३१ ॥
अहो विचारवंता सर्व हि सुलभ । भक्ति युक्तीनें सौख्य होय लभ्य ।
स्वात्मसुखदाता भूजावल्लभ । साह्य दासाला सवार्थीं ॥ ३२ ॥
इति तीर्थप्रसाद निरूपणं नाम समास नवम ॥ ९ ॥ ७ ॥

---

॥ श्रीरामसमर्थ ॥

श्रीरामचंद्रजी धन्य तूं दाता । कृपादेणगीउपकार स्मरतां ॥
कंठ दाटोन न ये बोलतां । वदवावी कथा तुमचे तुह्मी ॥ १ ॥
मागिलाध्याईं तीर्थप्रसाद । महिमा संकेतीं केला विशद ।
नाना प्रयत्नें होऊनि सावध । साजिरें करावें संसारीं ॥ २ ॥
स्ववर्णाश्रमी कर्माचार । शूद्रादि संसारी कां नारीनर ।
संपादूनियां मग व्हावें सादर । परमार्थनिधान साधावया ॥ ३ ॥
सायंकाळींचे कर्मधर्म सारून । श्रीमारुतीचें ध्यावें दर्शन ।
स्तोत्रप्रदक्षणा नमनस्तवनें । करावें साह्य सर्वार्थीं ॥ ४ ॥
श्लोक ॥ **मनोजवं मारुततुल्यवेगं जितेंद्रियं बुद्धिमतां वरिष्ठम् ।**
**वातात्मजं वानरयूथमुख्यं श्रीरामदूतं शिरसा नमामि** ॥१॥
दे बुद्धियोग बळ दे भवतरु । येश दे परमार्थी धैर्य दे स्थितिस्थिरु ।
जन्मादि भय वारीं आरोग्यतरु । कर्मोपासना चालवीं ॥ ५ ॥
परात्परभुवनीं होऊं रत । अजाड्य करीं हरीं जड जे समस्त ।
वाक्पटुत्व दे जे वदली मात । वर चि हो भीमदर्शनें ॥ ६ ॥

श्लोक ॥ **बुद्धिर्बलं यशोधैर्यं निर्भयत्वमारोग्यता ।**
**अजाड्यं वाक्पटुत्वं च हनुमद्दर्शनाद्भवेत् ॥ १ ॥**

धन्य मारुतीचें स्मरण प्रताप । प्रपंचीं परमार्थीं करी सुखरूप ।
भावितील जे तैसें धरूनि स्वरूप । कामना पुरवितो नानापरी ॥ ७ ॥
तो स्वयें घेऊनि दासावतार । भाळोन वोपिला आपणें चि वर ।
पढती भावें जे भीमरूपी स्तोत्र । सर्वांपरीं त्या सांभाळीन ॥ ८ ॥

स्तोत्र० ॥ **भीमरूपी०** ॥

स्नानसंध्यांतीं हो प्रातःकाळीं । सायंकाळीं हो हो आनंदवेळीं ।
सर्वदां हि धरावें हृदयकमळीं । स्तोत्र हें आतां ऐका पुढें ॥ ९ ॥
परामर्षोन तडीतापडी । सारूनि ससांग फराळपरवडी ।
करून न पडेसा प्रपंचवोढी । उघडावी घडी परमार्थ ॥ १० ॥
सावरीत प्रपंचा करीना नीट । वोढवती नानापरी संकटें ।
तेथें सत्पुरुषीं होऊनि संतुष्ट । केवि वर वोपिती सौख्य कैंचें ॥ ११ ॥
व्यापकपरीनें परोपकार । कमाई सारिखे जगदोद्धार ।
आळस अश्रद्धा करूनि दूर । नित्यनेम कीजे पंचपदी ॥ १२ ॥
वीणा चिपोळ्या मृदांग टाळ । घमंडी कीजे असल्या अनकूळ ।
नातरी स्वयें चि भावार्थबळें । सांप्रदायक्रमा थाटिजे ॥ १३ ॥
आदौ मंगळाचरणीं घ्यावें नाम । श्रीरामसमर्थ जयजयराम ।
स्तवनश्लोक ते ह्मणावे संभ्रमें । गुरुपरंपरानांव आठविजे ॥ १४ ॥
मग भजन करूनि सप्रेमयुक्त । ग्रंथ वाचावे साधीत अर्थ ।
भक्तिज्ञानवैराग्य वानिलें जेथें । तें श्रवण मनन करावें ॥ १५ ॥
श्रवण केलें ते क्रिया असावी । जेणें आस्था बहुता उपजे जीवीं ।
अहो गुरुपुत्राची हे प्रत्ययपदवी । दर्शनें चि व्हावें बहु सारिखें ॥१६॥

॥ श्लोक ॥ **तस्य दर्शनमात्रेण संसर्गेण च पार्वति ।**
**मूढोऽपि मुच्यते जंतुर्यथा नावाऽश्रितो जनः ॥१॥**

मग सिंहासनादि सगुणध्यान वैभव । सगुणनिर्गुणभजन स्तौत्य बरवें ।
धावा मागणें प्रेमभाक सर्व । पदें ह्मणावीं वेगळीं ॥ १७ ॥

पाळणादि असावे जिनसी पाठ । वंशावळी गुरूनांवा स्मरावें पष्ट ।
भजन करूनि घडघडाट । कराव्या आरत्या सेजारती ॥ १८ ॥
विधान सर्व हि समर्थांनीं । वानिलेति तें तें ठेऊन ध्यानीं ।
सप्रेमभावें नेम साधोनि । सार्थक जन्माचें करावें ॥ १९ ॥
तंव विनवोन पुसे श्रोतयांनीं । पंचपदी ह्मणती कोणत्यालागुनी ।
अहो मंगळाचरण भजन हे दोनी । श्रवण अद्वैत तिसरें ॥ २० ॥
सिंहासनादि सगुणध्यानवर्णन । चौथें हें पांचवें निजसार मौन ।
सेजारती हे जाणिजे पूर्ण । प्रसंगानुसार सांभाळिजे ॥ २१ ॥
मग निद्रा करावी जे अकळंक । स्मरत सुमनानें नाम जें तारक ।
किंवा ठेऊनि तुर्याग्रीं ध्यान तें चोख । वस्तु होऊन निज घेईजे ॥२२॥
कासया दुःस्वप्नें पडतील सांगा । वाटे तयाला मी होतो कीं जागा ।
नुन्य न पडे चि मुखाब्जरंगा । प्रसन्न वदन तें होये ॥ २३ ॥
तंव पुसे श्रोत्यांनीं दचकोन जीवीं । तुर्या काय ते कैसी जाणावी ।
उत्तर दे हरुषें गुरुगोसावी । अक्षोपासना तरि ऐका कळेल ॥ २४ ॥
कील पौणशें चौसिती अंगुळ । औट हस्त भूठाण जड तनु स्थूळ ।
अंगुष्टप्रमाण लिंगदेह चंचळ । पर्वार्ध कारण शून्यताबस ॥ २५ ॥
नीळबिंदु तो महाकारण । अष्टदळ अगोचर हृदय निज नयन ।
तेथून चि सर्व हि पदार्थ देखणें । चिदाकाश सर्वां मूळ तें ॥ २६ ॥
उजवा पुरुष तो वामे प्रकृति । येक्या पदार्थी दोघे हि रतती ।
तन्मय चि होती परि लक्षांतीं । पदार्थ मन वस्तु तीन वाटे ॥ २७ ॥
यास्तव तें ज्ञेयीं ज्ञान मन मिळवितां । येक चि होति ध्येय ध्यान ध्याता ।
तुर्या जाणोवा पर्तोन जाणता । तो निर्विकार निरंजन ॥ २८ ॥
अधिष्टान अर्धें अर्धा तो द्रष्टा । पूर्णमात्रा ते होतां येकवटा ।
गुरुनेत्रेण पश्यति गुरुमुखें मोठा । लाभाचा साठा होतसे ॥ २९ ॥
आत्माध्यासें तो निराळी पडे । मी च देह हा भ्रम भ्रांति उडे ।
तये सस्वरूपा येवढें तेवढें । ह्मणावें कोणें ऐक्यत्वीं ॥ ३० ॥

समदृष्टीचा भाव हा पूर्ण । अंतरदृष्टि ते येक दृष्टिध्यान ।
कृपादृष्टि ते वस्तु समान । पाहे दाखवी भजकासी ॥ ३१ ॥
स्थूळ सूक्ष्म कारण महाकारण । येकांतरीं येक तैं अंतर सर्वज्ञ ।
येकासी येक तें ऊर्ध्व हे चि खूण । पंचभूतखेळणें यांत चि ॥ ३२ ॥
येकेकात्वेगळें ह्मणोन परतर । सूक्ष्मात् सूक्ष्म खूणखाण विचार ।
चहुं शून्य गुह्य आकाश विहीर । सर्व बोल कटाव यांत चि ॥ ३३ ॥
तरि तनु चार साक्षीनें करूनि अरत । अखंड दाटे तो आत्मा निज नित्य ।
कृपा करावी सद्गुरुनाथें । तरी च परमार्थ होय सोपा ॥ ३४ ॥

इति श्री क्रमसार ग्रंथीं नित्यनेम निरूपणं नाम समास दशम ॥ १० ॥

---

॥ श्रीरामसमर्थ ॥

श्रीरामचंद्रा हे महाराज । मी च अपराधी ह्मणाया वाटते लाज ।
येक तरी असल्यां सद्गुण निज । वरकडां झोंबिजे साधावया ॥ १ ॥
मी अपराधी ह्मणतां क्षमा कराल । पुन्हां तरी जी व्हावें कीं निर्मळ ।
पालट चि नाहीं कां करूं तळमळ । आतां उचित वाटेल तें करा कृपें ॥२॥
मागें सांगितला नित्यनेम । मग सत्सिष्याप्रति गुरुपरब्रह्म ।
ज्ञानध्यानाचें सांगोन वर्म । कृतार्थ होईं ह्मणतिलें ॥ ३ ॥
तंव श्रोता ह्मणे जी मागें सत्पुरुषें । अधिकार न पाहतां कां केले शिष्य ।
अहो कार्यांतीं आज्ञापितां देवेशें । शोभिवंत केली उपासना ॥ ४ ॥
देउळ रचाया चित्र थोर धोंडे । जयविजयादि केले श्रमोन रोकडे ।
बांधिते वेळीं चीप दगड बंडें । घालोन पोटीं साजविलें ॥ ५ ॥
गेले अधिकारी ते कीर्ति करित । भोळे ते राहिले सेवा साधित ।
दोन्ही फळें हीं अपूर्व बहुत । परी विश्वास दृढ असल्या हो ॥ ६ ॥
अटकनदीचे पार पावणें । आर्जवीया नलगे बळ शाहाणपण ।
तेवि गुरुदासु विश्वासी पूर्ण । साक्षेपी यत्नें पर पावे ॥ ७ ॥

केवळ अविश्वासी मूर्ख व्यसनी । सन्मार्ग न धरी ना रते स्मरणीं ।
देखोवेखीनें विश्वास दाउनी । सवें चि पालटे कामिकु ॥ ८ ॥
सद्भाव अनुतापु न धरी च पोटीं । सत्य वदेना येक हि गोष्टी ।
सुवर्मरहस्य धरीना हृत्पुटीं । गुरु काय करील सांगा हो ॥ ९ ॥
नाटोपोनि होतां बळें अभक्त । कांहीं च न ह्मणावें तया गुरुनाथें ।
पर्तोनि येतां कथिजे हितार्थ । नातरी गेला च असे कीं ॥ १० ॥
मूळ गुरुवर्मा रक्षूं साधनें । बहुत चि असती वेगळीं चिन्हें ।
परि सर्वांसी विश्वासु प्रयत्न कारण । आतां कथासंदर्भ ऐका हो ॥ ११ ॥
सत्सिष्या सद्गुरु बोधीत संभ्रमें । संदेहबुद्धीचा निरसून भ्रम ।
ठेऊन सकृपें शिरीं करपद्म । तूं चि ब्रह्म ह्मणतिलें वरदयुक्त ॥ १२ ॥
जड स्थूळ सूक्ष्म तो चंचळ जीवें । शून्य अज्ञानीं धरिला ठाव ।
गुरुकृपें तो चि मी आत्मा भाव । ठसतां बोलिजे ज्ञान यासी ॥ १३ ॥
जाणीव तुर्येचें पदार्थ जाणणें । मायामिश्र तें मी ज्ञानस्फुरण ।
पर्तोन तत्थ्यानीं होतां सुलीन । तें आत्मज्ञान स्वसाक्ष आपेंआप ॥ १४ ॥
ज्ञानी अज्ञानी या चार च देह । त्यांत चि कमाईपणें भेद आहे ।
जड चंचळ शून्य ते अविद्या होये । मी च भावी तो अज्ञानी ॥ १५ ॥
वोलांडूनिया तिनी देहातें । उन्मनभुवनीं जो राहिला स्वस्थ ।
तो चि परात्पर आत्मा याचें महत्व । वानूं कोणी हि शक्त नव्हे ॥ १६ ॥

॥ श्लोक ॥ यानि कानि च वर्णानि ज्ञानदेहे प्रतिष्ठितम् ।
॥ तस्य दासस्य दासोहं भवेज्जन्मनि जन्मनि ॥ १ ॥

गुरुराज वदती हो सावधान । अहं ब्रह्म हें दृढ धरीं स्मरण ।
परिपूर्ण आत्मा तो तूं चि सघन । साक्षी निगमानें भरतसे ॥ १७ ॥
श्रुति हे प्रज्ञानमानंदं ब्रह्म । अहं ब्रह्मास्मि निजार्थ वर्म ।
तत्त्वमसि हे बोधभाव सुगम । अयमात्मा धर्म निजाचा ॥ १८ ॥
सत्यं ज्ञानमनंतं ब्रह्म पूर्ण । त्वमेव प्रत्यक्षं ब्रह्मासि वचन ।
सकळ श्रुति संतीं भाव हा जाणणें । परी ते वाचाळी कामा नये ॥ १९

मुख्य स्मरणाचा भाव प्रत्यय । अंतरीं च निष्कामें जडोन राहे ।
ब्रह्मविद् ब्रह्म तें तत्ध्यानें होये । गुरुभक्ता सोय कळे हें ॥ २० ॥
तंव श्रोता ह्मणे जी दिसे समान । मी देह मी ब्रह्म मी मी ह्मणणें ।
अहो देह मी ह्मणतां विखीं जडोन । पतनासी कारण होतसे ॥ २१ ॥
मी ब्रह्म भावितां मीपण चि उडे । सकळ हि संकल्पावरी आप पडे ।
ऐक्यत्व ध्यान तें स्वरूपीं जडे । न मुरडे पदावरूनि ॥ २२ ॥
तंव श्रोता विनवितु निरसा प्रश्न । आत्मा ब्रह्म द्वय हें कोणास ह्मणणें ।
वक्ता वदे तैं प्रेमें हांसून । तुह्मांस चि कीं बोधितों ॥ २३ ॥
आत्मनाम देहीं च निवडूं नित्य । ब्रह्मनाम ब्रह्मांडीं शोधूं सार तें ।
गुरुकृपें स्वरूपीं रमतां सत्य । नांवरूप ना स्थानमान ॥ २४ ॥
हें असो गुरु वदे ऐक रे भोळा । मी माझें ह्मणणें हें ठावा तुला ।
मम देह ह्मणतां तूं देहावेगळा । मी तूं ह्मणणें हि निरखसी ॥ २५ ॥
जें जें जाणसी तें तूं नव्हेसी । होय नाय आटलें मीपणासरसीं ।
गुरुकृपें तूं स्वानंदरासी । अनिर्वाच्य आत्मा सनातन ॥ २६ ॥
इति श्री क्रमसारग्रंथीं ज्ञाननिरूपणं नाम समास येकादश ॥ ११ ॥

---

॥ श्रीरामसमर्थ ॥

हे गुरुवर्या श्रीरामचंद्रा । मी कैसा हि तुमचा करुणाकरा ।
अपराधीपासील पदार्थ सारा । पावनरूप करा कृपें ॥ १ ॥
जे वाळिले भल्यांनीं कामक्रोधादि । ते निर्भये वागती माझ्या संन्निधीं ।
ते न पिटितां शोभिवंत कीजे दयाब्धी । जेवि भूषण विख जालें सांबासी ॥ २ ॥
मागिलाध्याई गुरुदयाघनें । महावाक्यसाक्षीनें कथिलें ज्ञान ।
परि तें न बिंबे साधनेंविण । सुगमोपायें ध्यान ऐकिजे ॥ ३ ॥
गुरुमुखें कळतां मी आत्मा हें ज्ञान । तें च स्थित होतां ह्मणावें ध्यान ।
ज्ञानात्ध्यानं विशिष्यते ह्मणोन । बोलिले भगवान साधिजे ॥ ४ ॥
घनदाट ब्रह्म तें आपेंआप । स्वरूपायेवढें स्फुरण संकल्प ।
तरि देहबुद्धीला करूनि समीप । मन येतें जातें कां ह्मणणें ॥ ५ ॥

देखणें चि आहे हो जगद्वरित । जाणीव निजडोळा ह्मणती त्यातें ।
जाणतां जडदेहा करूनि दूरस्थ । कळेल वर्म निःसंशय ॥ ६ ॥
पाहतां ईक्षून निधि[1]लहरीवत । जेथील तेथें होय समाप्त ।
मग स्वयमेय वस्तु अपरमित । येकमेवाऽद्वितीयं निःसंग ॥ ७ ॥
तनुबुद्धिविखाचा चढतां भ्रम । कोणी भावी मी जालियां ब्रह्म ।
माझेनि सृष्टीचा व्हावा कीं क्रम । आपण चि तरि ते भेद कां ॥ ८ ॥
कोणी भावी मी जरी व्यापक । सकळहृद्गतीचें व्हावें ठाऊक ।
तरी जाणणें नेणणें चित्ताचें अस्के[2] । यद्यपि योग हा तनुसमंधीं ॥९॥
किमपि मन नव्हे सर्वगत । येंगें जाणें हि न घडे तयातें ।
संकल्पस्फुरणाचा खेळ समस्त । स्वरूपांबरी होतसे ॥ १० ॥
मन जातें तरी देहीं नसावें । पदार्थी जडतां तेथें चि नटावें ।
येथून तेथवरी तरी सर्व जाणावें । हें असो जिणावें तरी शोभा ॥ ११
मनो ब्रह्मेति पारि जडसहवासें । भ्रष्टनष्टपणें लिप्त जालेसे ।
यास्तव पदार्थमात्रीं होतां उदास । निर्मळोन समरसे स्वरूपीं ॥ १२ ॥
किंवा मनाचें मूळ शोध घेतां । मनीं मनपण न उरे सर्वथा ।
कृपा करावी श्रीरामदाता । ध्यानयोगरंगीं मन मुरे ॥ १३ ॥
मूळस्फुरण तें वायुरूप । चंचळ जाणणें तें मनस्वरूप ।
बंदवोन ईक्षितां वातसंकल्प । जिरोन उपास्यरूप नांदे ॥ १४ ॥
अभ्यासेन तु कौंतेय अर्थ । वैराग्येण च गृह्यते मात ।
बोलिला हरीनें जिंकूं मनातें । परंतु मन आधीं वळखावें ॥ १५ ॥
आत्मसंस्थं मनः कृत्वा उपाय । ज्ञानं ज्ञेयं समं कुर्यात् सोय ।
मनामागें लागूं नये हे सिक्षा आहे । परंतु कारण गुरुकृपा ॥ १६ ॥
अहो येक्या देवाचें करितां स्मरण । पाहात मन तेथ राहे जडोन ।
मग दुसऱ्या देवाचे आठवण-। सरसीं मन तेथें सित्थ आहे ॥ १७ ॥

---

१ निधी=समुद्र. २ सर्व, संपूर्ण.

येथून तेथें रमतेसमई । इत्यर्थ मध्यें तैं नसे चि कांहीं ।
ते चि खुणेनें वस्तुच्या ठाईं । निरावितां तद्रूप होय जाय ॥ १८ ॥
आतां साधनयुक्त तें ऐका ध्यान । प्रपंचविखातें धरे लाऊन ॥
हळु सर्वेंद्रिया उपरमा[1] करून । बैसोन शुभ्र येकांतीं ॥ १९ ॥
लक्ष चौऱ्यासी आसनसमुद । त्यांतील चौंसिती साधिती सित्ध ।
त्यांमाजीं सार तें जाणा द्विविध । सिंहासन कमळासन ॥ २० ॥
अंतरार्थ याचा हो हृत्कमळआंत । स्थिरला कंजासनीं वंदिजे त्यातें ।
सिंहासनी ह्मणावा द्रष्टयाते । हें असो तुर्या ते उपासन ॥ २१ ॥
अहो वज्रादि घालिती जे हटयोगी । परि मिडकिती[2] प्रपंच विषयांलागीं ।
तरी धैर्यासन चि श्रेष्ठ या जगीं । कवण्या हि प्रसंगीं न धाके ॥२२॥
वागविजे आयुष्यमूळा[3] हळुहळु । नेदावें पळ मूळलिंगासी हाल्लं ।
न साहवें योचनासंकल्पविटाळु । श्रद्धासुकाळुमाजिं पडिजे ॥ २३ ॥
आवरिजे वासनावात वरील । मग न करी पिंडीं च हलकल्लोळ ।
गुरुदत्तनामाचे गुप्तस्मरणबळें । ठाण घालावें अंतरिक्षीं ॥ २४ ॥
सकळां पाहतें जें तें पाहतां फिरोन । पाहणेंपण तें सोज्वळे तेणें ।
मध्यस्थ मनमाया नाहीं च होऊन । तो हा येकात्मा भाव ठसे ॥२५॥
वृत्ति ते स्वरूपीं होतां समरस । न दिसे सभोंवती पदार्थ दृश्य ।
मग अंतर्यामीं उमटती प्रकाश । ते हि द्रष्टत्वें सारिजे ॥ २६ ॥
पीतवर्ण पृथ्वी श्वेतरंग जळ । तांबुस अग्नि च वातज्योत नीळ ।
आकाशरूप तें गडद काळें । हे वोलांडितां निज ते आत्मज्योति ॥२७॥
नाम रूप सांगाया न ये पष्ट । अंतर्बाह्य तें रूप घनदाट ।
आपण तें चि तैं भेदाची वाट । मोडोन स्वसंवेद्य सुखावे ॥ २८ ॥
बाहेरून घडे हो अंतर पाहणें । बैसो बाहेरी नसे कीं स्थान ।
शून्य जितुलें तें नाहीं च होऊन । आपरूप होय घनदाट ॥ २९ ॥

---

१ शांत करून. २ धांवतात. ३ आयुष्यमूळ जो प्राणवायु त्याला. ४ लिंगदेहस्वरूपी जें मन त्याला.

हे न होय अवीका जरि तरुभूमिका । तरि सत्सेवाबळें तोषऊन देशिका ।
उपदेशवचनींचा लाभ जो निका । ध्या विश्वासें पक्षीवत ॥ ३० ॥
जेवि तुंबाफळ खेळे समुद्रआर्पी । तेवि कायामायादि भासे स्वरूपीं ।
आत्माराम चि होऊन यद्यपि । उपासनाक्रम सांभाळितु ॥ ३१ ॥
इति ध्याननिरूपणं नाम समास द्वादश ॥ १२ ॥

---

॥ श्रीरामसमर्थ ॥

हे गुरुवर्या तव पदा वंदन । करून बहुतेकी जाले पावन ।
त्यांमाजीं मी येकु रंक हीन दीन । न नमितां धन्य ह्मणवा जी ॥१॥
मागें सांगितला ध्यानमहिमा । आतां कळऊं संकेतीं पंचकर्ण तुह्मा ।
जे बिंबतां मी देह माझा या भ्रमा । वेगळा आपणु साक्षित्वें ॥ २ ॥
द्रष्टा द्रष्टत्वें न उरे सेखीं । जेवि लवण विरालें समुद्रोदकीं ।
भ्रमभेदेविण अपार सुखी । होऊन नांदे आत्मा स्वयें ॥ ३ ॥
नांव रूप प्रबोधालागीं सांगणें । येरवीं प्रत्यई कायसें बोलणें ।
जेवि नभींचा शांततापवन । कांहीं च कथन न साजे ॥ ४ ॥
देवभक्त असती मुळीं अनन्य । तत्वांतीं न उरे मीपण तूंपण ।
सच्चिदानंद वस्तुच चि पूर्ण । आत्मनिवेदन या नांव ॥ ५ ॥
देवाचे च सर्व हि जड पदार्थ । चंचळ मन आत्मा सल्लीन तेथें ।
निश्चळीं निश्चळ अखंडित । त्रिविधा परी हें निवेदन ॥ ६ ॥
असो हें ब्रह्मीं स्फुरण जें होतें । तें चि मूळमायायुक्त पंचभूतें ।
जें जें बोलावें तें साजे तेथें । संकल्प ईक्षण सत्त हेतु ॥ ७ ॥
या पंचभूतां वेगळी कांहीं । आणीक मांडणी कांहीं च नाहीं ।
पंचभूतात्मकीं विस्तार सर्व हि । ध्यानारूढ होतां कळेल तैं ॥ ८ ॥

श्लोक ॥ **स्वर्गे मृत्यौ पाताले वा यत्किंचित्सचराचरं ।**
**सर्वं पंचात्मकं राम षष्ठं किंचिन्न दृश्यते ॥ १ ॥**

---

१ धैर्य. २ कडु भोपळा. ३ शेवटीं. ४ समजावें ह्मणून. ५ श्रीदासबोध १२-५-१६।२१ पहा.

निराधारीं जें होत स्फुरण । तें जाणीव तुर्या उल्लेख चैतन्य ।
आकाश ऐसें त्यासी अभिधान । तो चि अंतरात्मा शुद्धसत्व ॥ ९ ॥
नभसंज्ञीं च हेतु ज्ञप्ति जाणीव । दिसलें चळलें सवात या नांव ।
तर्क तीक्षण जें पाहणें स्वभावें । तेजप्रभाव जाणिजे ॥ १० ॥
आपरूप तें वाटे पसरट । भूमीतें भासलें जालें घट्ट ।
पुढें तें दिसों लागलें पष्ट । पावोन जडत्व विस्तारतां ॥ ११ ॥
जड कठिण क्षिति द्रव बोल आप । उष्णता भासणें अग्नीचें रूप ।
चंचळ चैतन्यता वायु व्याप । नभ शून्य अवकाशधर्म हे ॥ १२ ॥
वरिवरी पाहतां वेगळीं दिसती । परि येकेकीं पांच हि मिळोन खेळती ।
जेव्हां सृष्टीची रचना न होती । तैं मूळ कर्दम हा ज्ञाते हो ॥ १३ ॥
मग अवघा चि भासला गडद भास । हिरण्मयी दिसले वेगळे प्रकाश ।
पुढें जडत्व पावल्यावरी सादृश्य । विस्तार पाहती सर्व हि ॥ १४ ॥
कांहींयेक तें कार्यकारण । न होय न होतां पांच हि मिळणें ।
पंचकर्णप्रमर्यी नानापरीनें । बोलिलेति सज्जन विलोका ॥ १५ ॥
तंव दचकोनियां पुसे श्रोता । काय जाली जी गुणांची वार्ता ।
अहो कर्मधर्माचा शोध घेतां । भूतविस्तारीं आटती ॥ १६ ॥
आकाश सत्वा कायसा भेद । रज पवन अग्नि आप त्रिविध ।
तम पंचविषईं पृथ्वी च सिद्ध । यद्यपि जाणिवीं वळख पडे ॥ १७ ॥
कोण तत्त्व ह्मणावें वडील सानें । जेवि देकारा कैदी मिळाले ब्राह्मण ।
येकेकापाठी निघतां घेऊन । मान सौख्य विसावो भिन्न पडले ॥ १८ ॥
तेवि कार्यवरी भूतें भिन्न भिन्न । दिसतां पडलें नामाभिधान ।
काळकर्मादि लिगटले तेथून । मग साजलें जें जैसें वानिती ॥ १९ ॥
स्वरूपीं स्फुरणाचा संकल्प विवर । त्या सूक्ष्म गुह्य नभीं वाजे समीर ।
महत्तत्त्व उगमीं उद्भवला ॐकार । तेथून विस्तार सर्व जाला ॥ २० ॥
आणि क्षिति प्रतिष्ठितां जगदीशानीं । डगमगली सावरूं धाडिलें पाणी ।
विघरऊं पाहतां योजिला अग्नि । तो उग्रला आला वायु सळीं ॥ २१ ॥

मग नभासी धाडितां तो जाला व्यापक । वैरत्व मोडलें जालें सख्य ।
येकाधिक येकाजवळी विख । पंचात्मकी भू कां श्रेष्ठ नव्हे ॥ २२ ॥
एवं मूळतत्त्व येक ते माया जाणीव । तेथून विधीनें जालें सर्व ।
समजाऊं कटावां जाला ठाव । पिंडावरून पडताळितां ॥ २३ ॥
निर्गुणस्वरूपीं माया जाली । गुणमाया तिच्या पोटा आली ।
सत्वरजतमाची उत्पत्ति जाली । मग तमाहून नभादि भू भूतें ॥२४॥
हें असो मुळीं जो संकल्प उठिला । तो लिंगदेहाकृती जीव जाला ।
तेथून स्थूळ हा विस्तारला । एवं द्वयदेही सर्व कथन ॥ २५ ॥
मीच स्थूळ जीवा जो अभिमान । अज्ञानभ्रांतीतें देह कारण ।
अतीत जडदेहा मी वस्तु भावणें । महाकारण तुर्या ज्ञानदेह ॥ २६ ॥
विराट हिरण्य अव्याकृती माया । तद्वत चि ब्रह्मांडीं[1] ह्या चारी काया ।
प्रकृतिपुरुषासहित दशदेहा । जाणता वेगळा तो आत्मा ॥ २७ ॥
पंचकाया दशतनु अष्टदेह । कोणी वदताती सर्व ब्रह्ममय ।
परी सर्व हि पांचांचें कर्तृत्व होय । मग श्रुतिमत बोलती बहुधापरी ॥२८॥
निराभास नभ जो ब्रह्म सनातन । तो चि अंतरात्मा सन्मिश्र पवन ।
स्वल्प शुद्ध भासलें त्यांत जीवपण । मग क्रमानें थाटला प्रपंच ॥ २९ ॥
तो अंतरात्मा चि देव शिवशक्ति । प्रणव मन माया पुरुष प्रकृति ।
हें असो चहुंदेहा निरसून सुमती । स्थितिसंपन्न होईं पां ॥ ३० ॥
पंचेवीस तत्वांचा स्थूळदेह । काम क्रोध शोक मोह भय ।
आकाशअंश हे निःसंशय । परंतु प्रत्यईं भेद असे ॥ ३१ ॥
न घडे आकाशीं कर्तृत्वहेत । चंचळात्मा येक तो होय द्वयभूत ।
अंतःकरणादि लिगटले त्यांत । कामक्रोधादि माने त्यास चि ॥ ३२ ॥
कामादि लिंगीं अंतरा झगटती । श्रोतादि दश हे स्थूळीं वर्तती ।
यापरी द्वयदेहा पडली ग्रंथी । जीवात्मा जालें बंधन ॥ ३३ ॥
चळण वळण प्रसारण अकोचन । निरोधन पांच हे वायूचे गुण ।
क्षुधा तृषा आळस निद्रा मैथुन । अग्नितत्व हें जाणिजे ॥ ३४ ॥

---

१ ब्रह्मांड.

शुक्लीत श्रोणीत लाळ मूत्र स्वेद । गुण आपाचे वळख प्रसिद्ध ।
अस्ति मांस त्वचा नाडी रोम विध । हे पृथ्वीचे आतां सूक्ष्म ऐका ॥३५॥
अंतःकरण मन बुद्धि चित्त अहंकार । अंतरात्मातत्वें हे ऐका समीर ।
प्राण अपान उदान समान प्रकार । व्यान सर्वगत सह पांच ॥ ३६॥
श्रोत्र त्वचा चक्षु जिव्हा घ्राण । हे अग्नीचे जाणावे गुण ।
वाचा पाणी पाद गुद शिश्न । आपाचे कर्ण जाणावे ॥ ३७ ॥
शब्द स्पर्श रूप रस गंध । हे पंचविषय पृथ्वीचे प्रसिद्ध ।
त्यांचेनि च पिंडब्रह्मांडविध । आतां बत्तीस तत्वें ऐका अनकूळ ॥३८॥
स्थूळ सूक्ष्म कारण महाकारण । देह चार अवस्था करा श्रवण ।
जागृत स्वप्न सुषुप्ति तुर्या जाण । आतां अभिमानी चार ऐका ॥३९॥
विश्व तैजस प्राज्ञ प्रत्यगात्मा । नेत्र कंठ हृदई मूर्ध्नि स्थानमहिमा ।
स्थूळ प्रविविक्त आनंद भोग तुह्मा । आनंदावभास कळविला ॥ ४० ॥
अकार उकार मकार अर्धमात्र जाण । रज तम सत्व शुद्धसत्व हे गुण।
शक्ति ते इच्छा द्रव्य क्रिया ज्ञान । व्याऐसी तत्वसमुदाव हा ॥ ४१ ॥
अज्ञान ज्ञानसह चौऱ्यासी । अन्वय व्यतिरेक ह्मणती यासी ।
ऐक्य चि आहे पिंडब्रह्मांडासी । शोधितां ताळा पडतसे ॥ ४२ ॥
पृथ्वी तनूला आहे लगट । येथ तेथ हि गगन घनदाट ।
बाहेरील वाताचा होतां संघट । भरोन प्राण खेळती ॥ ४३ ॥
बाहेरील ऊष्णानें क्षुधादि टिके । उदक भरण्यानें अंतरीं सौख्य ।
मुख्य अंतरात्मा खेळणार येक । सर्व हि मांडण पांचांचें ॥ ४४ ॥
षष्टं किंचित् न दृश्यते वाक्य । अर्थ ते वस्तु तूं निष्कळंक ।
स्वात्मानंदाचें हें भोगिजे सौख्य । श्रीसद्गुरुवरदानें ॥ ४५ ॥
इति क्रमसार पंचीकर्णनिरूपणं नाम समास त्रयोदश ॥ १३ ॥

---

॥ श्रीरामसमर्थ ॥

हे गुरुवर्य मी दीन पतित । काय होतें कीं नेणो सुकृत ।
वरपांग तरी या लौकिकांत । तुमचा ह्मणोन सांगतों ॥ १ ॥

इतुक्यास्तव चि हे दीनबंधु । लागो भोळ्याला स्वरूपछंदु ।
वदवा कृपेनें सवर्मशब्दु । जेणें धन्यत्व विस्तारे ॥ २ ॥
आतां श्रोतेनो व्हा सावधान । मागें ऐकिलें कीं तत्वपंचीकर्ण ।
मग सत्कृपें सत्सिष्या करूनि ईक्षण । ऐक निजात्मा ह्मणतिलें ॥ ३ ॥
द्रष्टा साक्षी तूं वस्तु सर्वज्ञ । अलिप्त समजाया हें हि बोलणें ।
नामापाठीं च वर्ते लागून । स्थूळ सूक्ष्म रूप मायामय ॥ ४ ॥
माया ते दिसतां हि नव्हे सत्य । मिथ्या वदतां ते करी भ्रांत ।
तरि निरसोन गुरुखुणें मीतूंसहित । कांहीं च न होन राहीं पां ॥ ५ ॥
परतोन देहाला द्रष्टा होसी । तरि देख दूरतर कायामायेसी ।
भरोन सर्वत्रीं तूं चि असती । तें हें ह्मणणें कायसें ॥ ६ ॥
जंव दिसेल आपणा तनु हे दूर । तंव आपणांत आपणु व्हावें स्थिर ।
दिसत असतां हि सर्व विकार । निःसंगपणें नांदसी ॥ ७ ॥
स्वरूपस्थित ते सदां हि सघन । उठतील त्यावरी जें जें स्फुरण ।
तें तें तुज होय दृश्यमान । आश्चिर्य मानणें नव्हसी तूं ॥ ८ ॥
न बोलवे ह्मणणें मौन्य धरणें । भावोन तद्रूपीं अनुभव सांगणें ।
हें हि निःसंगा नसे गुंडाळणें । शेषादि श्रमस्थान हें चि पां ॥ ९ ॥
तंवरी मन गेलें आलें वाटे । जंवरी ऐक्यता वस्तु न भेटे ।
संकल्पितां तेथें चि स्फुरण उठे । जेथील तेथें लय पावे ॥ १० ॥
रंगातीत तूं अज अव्यंग । परात्परात्मा नित्य निःसंग ।
साधनें या देहीं चालती सांग । सहजींसहज ते वळख धरी ॥ ११ ॥
जाणीव तंव रूपा लिगटें चि आहे । तिजवांचुन अणु हि न होय कार्य ।
सदां सर्वत्रीं भरून वाहे । उमज निजज्ञानें तुझा तूं ॥ १२ ॥
संकल्प विकल्प वासनात्मक । मन करील जें जें कार्य ठाउकें ।
सकळिकाप्रती होतसे अस्क । साक्षी च असती समजल्या ॥ १३ ॥
मना आवडलें आत्म स्वीकारी । मानसपूजा ते जाणिजे बरी ।
विटोन विषयांतें त्रास धरी । व्रतउद्यापन जाणिजे ॥ १४ ॥

अनुहांत श्रोत्रीं आत्मप्रभा नैनीं । मूर्ध्नींत आठउ महावाक्य घ्राणीं ।
वाणी जिव्हाग्रीं धैर्य नाभिस्थानीं । उभयांग पुरुष प्रकृति ॥ १५ ॥
सप्तचक्रीं बावन्न मातृका । क्षेत्ररूप चि घट हा आसका ।
उत्तम पुरुष तो आनंदघन सखा । ब्रह्मांडरचना ते देहीं वसे ॥ १६ ॥
कांहींयेकाचा पडतां विसर । आठवितां कीं देऊन नेहार ।
तें मूळस्थानींचें ध्यान साचार । देव दाता वदे भक्त कीं ॥ १७ ॥
अग्निदेव तो जठरीं वसे । सहज नैवेद्य पावत असे ।
ऐसें चि बहु कांहीं नेम ते घडतसे । कळोन ध्यावें गुरुमुखें ॥ १८ ॥
सो शब्दानें चढतसे श्वास । हं उच्चारें जाय निःश्वास ।
सोहं हंसा तें महावाक्यरहस्य । बैसोन येकांतीं ऐकावें ॥ १९ ॥
या महावाक्यअर्थ तो मी च वस्तु । चाले अजपा हा अखंडितु ।
आपणें चि असे कीं देहातीतु । वर्तावें प्रशस्थु गुरुखुणें ॥ २० ॥
वाटेल सहजीं चालतां नेम । कां पुसिजे गुरूला कां कीजे श्रम ।
अहो विवेकदृष्टीनें हें जाणिजे वर्म । सकळ साफल्य गुरुवाक्य ॥ २१ ॥
पत्रांत असल्यां हि श्री दोन चार । मान्यतेस धरीं लिहितां श्रीकार ।
वरकडानें न साधे कारभार । तेवि साध्य हि साध्यता गुरुनेमें ॥ २२ ॥
भट्ट संन्यासिया विधि सर्व ठाउक । आपणा न करी कीं पट्टाभिषेक ।
कन्यांगीं असे कां नग अनेक । मंगळसूत्रानें पति लाभे ॥ २३ ॥
अहो ध्यान ठसल्यां हि दृष्टि मुरडोन । न टाकिजे हो तद्विर्षीं साधन ।
अव्हेरितां आतां कासया ह्मणोन । सिद्धपतन घडतसे ॥ २४ ॥
पुण्यवंताला तारक मंत्र । सांगतां चि ठसे जेवि गळसूत्र ।
परि नेमजपाला करितां अव्हेर । सौख्य तें आइतें लउडे पां ॥ २५ ॥
महावाक्यउपदेशीं ठसोनि ज्ञान । भर्वसा हि जाला मी वस्तु ह्मणोन ।
करितां अश्रधें श्रवण मळिण । कार्य साधलें तें नासे हो ॥ २६ ॥
जेवि मी ज्ञानी मी मुक्त सिध्ध । या भर्वसें होता विषयीं लुब्ध ।
नासोन अनुभऊ वाटे भेद । सिध्ध बध्ध होये न सावरे ॥ २७ ॥

हें असो कथिलें जें जप ज्ञान ध्यान । नमन श्रवणादि मानसपूजन ।
नेम चालविजे स्मरणी ठेऊन । होऊन सुखिया तारिसी ॥ २८ ॥
तंव येकांग योगी पुसे हांसोन । पुरे हो सुखी होऊं येकसंधानें ।
पडोन बहुसाधनीं कासया सिणणें । वक्ता वदे कां वर्म नेणा ॥ २९ ॥
येक चि कणिकीं आयाबायांनीं । बोटवे देटवे सेवया करूनि ।
ठेऊन प्रत्येकी वाढितां सिजऊनि । येक चि परि भासे भिन्नरुची ॥ ३० ॥
त्रासेना न ये आळस अश्रद्धा । सर्वकाळ चाले परमार्थधंदा ।
कनकखोटी ते न शोभे कदां । तें चि भिन्न भूषणें ल्याल्याविण ॥ ३१ ॥
सत्य श्रीसद्गुरुवचनप्रमाणें । साध्यावरी हि कीजे साधन ।
प्रबळोन उपासना तेणें गुणें । बहुतां उपकारा येईल ॥ ३२ ॥
ह्मणाल येविषईं श्रुतिप्रमाण । व्हावें चि तरी असे हें प्रत्ययबोलणें ।
वदनांत शर्करा घालोन वचन । हुडकणें नलगे कां गोडी ॥ ३३ ॥
अहो बहु सांप्रदाईं साधनसोय । दाऊन येखादा लाविती भये ।
सर्वयोग्य करिती समर्थराय । कैसा हि हो कां पर पावतो ॥ ३४ ॥

इति श्रीक्रमसारग्रंथीं । संधानयोगकथनं नाम समास चतुर्दश ॥ १४ ॥

---

॥ श्रीरामसमर्थ ॥

समर्थस्वामीची पदवी धन्य । कृपा करावी करुणाकरानें ।
भोगून आनंदती भाविकजन । दाते च ते होती पुढत पुढतीं ॥ १ ॥
नलगे सत्सिष्या करावे कष्ट । सिकोन बहुविद्या करणें खटपट ।
आइती चि बांधावी अचाट लूट । नामाधारी होउनी ॥ २ ॥
श्रोता पुसे जी न पढोन वेदांत । केवि सिष्य तो होईल कृतकृत्य ।
कैसा बोधील जी आणिकातें । वक्ता समजावी यापरी ॥ ३ ॥
वेद वेदांत शास्त्र पुराण । रहस्य गुरुवचनीं आहे प्रमाण ।
न घालितां कचाटीं सारांश साधन । सांगून करिती कृतार्थ ॥ ४ ॥
मुख्य पढण्यांतरीं जे क्रिया नेटकी । ससांग चाले ते दासासन्मुखी ।
प्रत्यईं आणिका करिती सुखी । जेवि सिद्धवाक्य ऊर्जिता येक पुरे ॥५॥

वंद्य देवादिका सद्गुरुसेवक । जरी न ये चि राजाला करूं पाक ।
यातिहीन परी तो सहजवाक्य । करवोन जेववी भल्यासी ॥ ६ ॥
सोळा रुपयांच्या कवड्या वाहतां । लुकसांन हि पडे न मने चित्ता ।
सारसाधन तें धनमोहर तत्वता । परि विश्वासिका होय सफळ ॥७॥
नित्यसार निज जें निरोपम्य । मायातीत केवळ ब्रह्म ।
जडतां तत्ध्यानीं तदैक्यप्रेम । सर्व साधनफळा फळ श्रेष्ठ ॥ ८ ॥

॥ श्लोक ॥ **पृथिव्यां यानि तीर्थानि स्नानदानेषु यत्फलम् ।**
**तत्फलं कोटिगुणितं ब्रह्मज्ञानसमोपमम् ॥ १ ॥**
**स्नातं तेन** + + + ॥ १ ॥
श्रुतिः ॥ **ब्रह्मविदाप्नोति परम्** + + + + ॥

ब्रह्मज्ञानाचें धन्य महिमान । पारावार नाहीं पुण्याकारणें ।
तें भ्याडभीडें जनाचें नव्हे संग्रहण । प्रपंचचपेटीं सुकृत हरे ॥ ९ ॥
गाढवामधून कीं मेषामधून । जातां पुण्याचें होय संहरण ।
घेतां परान्न कि परवस्त्रदान । अळुमाळ[2] भयानें पुण्य सरे ॥ १० ॥
करोन व्रतनेमु बहुकाळवरी । येक्या दिनीं इलुसें[3] चुकलें जरी ।
समूळ सुकृतातें होय बोहेरी[4] । मजुरी भला कीं याहुनी ॥ ११ ॥
अहो करितां प्रेमानें रामनामस्मरण । वस्तुध्यास कीं आत्मचिंतन ।
कोण गणवेल तें अपार पुण्य । खर्चितां विश्वानीं न सरे चि ॥ १२ ॥
श्रोता विनवितु हें अधिकारी कृत्य । इतर सामान्या गति काय येथें ।
वक्ता उत्तर दे सार सुलभ त्यांत । सर्व हितसाधनें आहेति ॥ १३ ॥
अहिर्निसीं कीजे रामनामस्मरण । सकळ साधनांचें फळ हें पूर्ण ।
सगुणमूर्तीचें करावें पूजन । त्यजोन कापट्य विषईक ॥ १४ ॥
यथाशक्तीनें भुकेल्या अन्न । अर्पण करावें प्रेमेंकरून ।
संकट जरी असे तरी साह्य करून । स्थळ देऊन हितगुज पुसिजे ॥ १५
सेवा करावी संतसाधूची । प्रीति धरावी कीर्तनकथेची ।
गति प्राप्त येणें अपसयां[5] चि । आणीक सुलभ भजन हो ॥ १६ ॥

१ नुकसान. २ किंचित. ३ थोडकें. ४ नाश. ५ आपोआप.

श्रीरामभजनीं असे जो तत्पर । निश्चयेंसीं पावेल तो परपार[1] ।
सर्वसौख्यदाय मुक्तिमाहेर । श्रीरामभजनीं विश्वासिजे ॥ १७ ॥
किंवा बैसोन येकांतीं रानामाजीं । निरवोन मनाला गुरुपदाब्जीं ।
भाकितां करुणा श्रीराम निजीं[2] । स्थिरवोन वृत्तीतें तारील ॥ १८ ॥
अथवा श्रीरामनाम स्मरत । नित्य नूतन मारुती पाहात ।
पूजित फिरतां षण्मासांत । स्वहित परमार्थ फावेल ॥ १९ ॥
श्रोता विनवितु आणिक ऐका । परमार्थ नावडे संसारलुब्धका ।
अंतीं तरी जी तयासी धोका । तुटाया उपाय काय कीजे ॥ २० ॥
गुरुमार्गविन्हा तों न घडे चि सोय । कांहीं च साधीना तरी काय उपाय ।
स्वल्प अल्प तरी धरितां धैर्य । हळुहळु सेवटा नेइजेल ॥ २१ ॥
कळोन घ्यावें हो त्यांनीं मरण[3] । तेव्हां तरी व्हावें उदासीन ।
रामनाम स्मरावें लक्ष लाऊन । कां सावध न होइजे अवधिवरी[4] तरी ॥ २२
स्वछायाग्रीवीं[5] लक्ष लाऊन । पाहावें नभांतरीं उचलोन वदन ।
शिर न दिसता षण्मासा मरण । आलें जाणोनि कीजे त्वरा ॥ २३ ॥
दश फेरावरी फिरतां श्वास । मरणास अवधी जाणिजे वरष ।
आरशांत पाहातां बुबुळ न दिसे । तरी काळ समीप जाणावा ॥ २४ ॥
नाद कानींचा नयनाचें चक्र । नित्य साधावें होऊनि तत्पर ।
न ऐकतां न दिसतां मरणद्वार । नव सप्त दिवसा पावेल ॥ २५ ॥
उरावरील आधीं वाळतां चंदन । समीपीं आलें जाणिजे मरण ।
पाहावें मूर्ध्नीवरी[6] नित्य कर ठेऊन । स्थूळता तनुभ्रम टाकिजे ॥ २६ ॥
योग हो साधनादि कराया कार्य । पाहिजे गुरुआज्ञा वरदउपाय ।
अहो स्वल्पांत आहे कीं परमार्थसोय । येक तनुभ्रम त्यजिजे गुरुकृपें ॥ २७
गुरुशुश्रूषी जो निष्ठावंत । सर्व हि सिद्धि वोळती तयातें ।
संकट न पडे चि भक्तराजयातें । तो वर्ते उदास सर्वदा ॥ २८ ॥

---

१ (भवसमुद्राचे) पलीकडचें तीर. २ स्वस्वरूपाच्या ठिकाणीं. ३ आपलें मरण किती जवळ आहे, तें पाहण्याचीं कांहीं साधनें आहेत; त्यांपैकीं कांहीं पुढील २३ ते २६ ओव्यांतून दिलीं आहेत, तीं समजून घ्यावीं. ४ ऐन वेळीं, मरणाच्या पूर्वीं कांहीं दिवस तरी. ५ ग्रीवा=मान. ६ मस्तकावर.

उदासपणाचें विंबतां वर्म । सफळ ते होती परमार्थश्रम ।
वस्तुप्राप्तीचा हा चि धर्म सुगम । संतांचा परम प्रियकर ॥ २९ ॥
हें असो ऐका पुढील वाक्य । यातिवर्णकर्म तें सर्वां ठाऊक ।
तें हि सारिजे नित्यकृत सम्यक । आणि उपासनाक्रम संपादिजे ॥३०॥
पुण्यतिथ्यादि देवउत्छाव । पारंपर्य[1]विधान तें जाणोन सर्व ।
कीजे प्रेमादरें यथावैभवें । आळस अश्रध्दा नेमीं नागिजे ॥३१॥
श्रोता पुसे जी जपध्यानादि । नेम सांगितले गुरुदयानिधीं ।
संत कीं स्वामींचे येतां सन्निधीं । नेमीं राहिजे कीं त्यागिजे ॥३२॥
वक्ता वदे पां हें काय पुसणें । प्रत्यक्षापुढें कासया प्रमाण ।
श्रवणपठणादि नेमानें खूण । कळोन गुरुसेवा कराया कीं ॥ ३३ ॥
कुळदेवादि नेमकर्मधर्म आपुला । सद्गुरुआश्रमीं न कीजे गल्बला ।
नेम घडो न घडो परि गुरुसेवेला । अंतर पडेसा न कीजे ॥ ३४ ॥
रुष्टतां गुरु कांहीं अंतरोन । प्रसन्न चि कीजे सेवाबळानें ।
जेवि वेदांतमळीणा वेदांतश्रवणें । स्वरूपाचिंतनें साध्येंसीं ॥ ३५ ॥
सद्गुरुआज्ञा प्रमाण मुख्य । नाश्रइजे आपुले जाणीवा टकठकें ।
आज्ञारहणींत ही चालोन विवेकें । सार्थक जन्माचें करावें ॥ ३६ ॥
मार्गें तों झोळीपादुकाधर । चालावा पुढें निशाणदार ।
उजवेसीं करणारा कारभार । बोध ऐकणार असावा डावीकडे ॥३७॥
गुरुराज निजल्यावरी निजावें । आधीं च उठोन उभा राहावें ।
मागून जेवावें प्रसादास्तव । बैसणेंचालणेंदि आज्ञावत ॥ ३८ ॥
दासबोधादि ग्रंथीं समर्थें । कळविले आहेति धर्म समस्त ।
बाळभावानें त्यांतील किंचित । भाविका कळविले त्यांचे कृपें ॥ ३९ ॥
धन्य माहाराज दाससमर्थ । सर्वांपरीनें केलेति स्वस्थ ।
जयांचे द्वारीं सिद्धयादि समस्त । राबती ढकलितां बळें चि ॥ ४० ॥

---

१ आपल्या परंपरेंतील,

धरून जावया शरण्य संगतीं । उभ्या मुक्त्या त्या वाट पाहाती ।
प्रसन्न जे स्थळीं जगदाधिपाति । आत्माराम प्रभुवर्य ॥ ४१ ॥

इति श्रीक्रमसारग्रंथीं । प्रश्ननिरूपणन्नाम समास पंचदशः ॥

॥ जयजयराम ॥

---

॥ श्रीरामसमर्थ ॥

श्रोतेनो काय मी वानूं नवल । अघटित लीळा दाविली दयाळें ।
रंक हीनदीना नांव आपुलें । सांगाया योग्य केलें हो ॥ १ ॥
बहु दुष्कृती मी दुर्बळु दीन । येऊनियां बळें केलें ईक्षण ।
श्रीमारुतीकडे फिरऊन मन । आपणासन्निधीं घेतलें ॥ २ ॥
चालतां कुमार्गीं नेघोनं[2] वरातें । परमार्थीं ह्मणविलें नस्तां सामर्थ्य ।
यावरून पाहिजे योग्यता सुकृत । ह्मणणें लोकांचें मज नावडे ॥ ३ ॥
माया निरसेना न सुटे प्रारब्ध । यत्न चालेना हरेना भेद ।
ऐसें कल्पितां तनुभ्रमसमंधें । तो चि आसुर महादोषी ॥ ४ ॥
अघटितकरणी देवदयाळ । त्या नियमातें योजिती मूर्ख चांडाळ ।
भक्ता आवडलें तें करितो सफळ । किंवा स्वयमेव दावील विचित्र ॥ ५ ॥
अहो हरिसंकल्प सृष्टीं कल्पवृक्ष । जें कल्पावें तें होतसे प्रत्यक्ष ।
स्वहित न इच्छितां नतद्रक्षे[3] । दडती आधारें लालुचींत ॥ ६ ॥
हें असो प्रपंचीं सौख्य तें भाग्य । शोभा परमार्थीं पूर्ण वैराग्य ।
दोनी हि नसतां यथायोग्य । दैवहीनासी स्वीकारिलें ॥ ७ ॥
आत्माराम हें नामाभिधान । ठेविलें सहजीं कळो निजखूण ।
धन्य संतांचें हें महिमान । मज मूर्खाचेनि वर्णना केवि होय ॥ ८ ॥
भलेभल्यांनीं वर्णिती कीर्ति । सत्संगतीनें संत चि होती ।
विख्यात त्रयजगीं जयांची ख्याति । तारिती नाना साधनेंविण ॥ ९ ॥

---

१ कृपवळेकन. २ घेऊं नये. ३ कृपण.

जननी[1]सम जरी तरी गर्भवास नाहीं । संगदोष नाहीं कीं बा[2] भाविता हि ।
देव भावावा तरी ज्याचे उपाईं । दास ते होती देव स्वथा ॥ १० ॥
न दिसे तें दाऊं वदूं निजगूज । मानवाकृति धरूनि सहज ।
उत्थापकृत्य करिती महाराज । श्रीशंभु वदे ते मम मित्र ॥ ११ ॥
आत्माराम जो अयोध्याधीश । तो[3] चि या लीळेचा धरिला वेष ।
महिमा संतांचा कळे ज्यास । सायुज्यमुक्तीचे होती धणी ॥ १२ ॥
धन्य संत ते श्रीगुरुमूर्ति । वसती ज्या संगीं नवविधा भक्ति ।
ज्या भक्तीचेनि योगें भूमिजापति । होऊनि साहकारी सांभाळितु ॥ १३ ॥

॥ श्लोक ॥ **श्रवणं कीर्तनं विष्णोस्मरणं पादसेवनम् ।**
**अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ॥ १ ॥**

धन्य भक्तीचें थोर महिमान । मुक्ति ज्ञानमाता निरसी भवभान ।
वस्तुरूप वृत्ति करी निधान । श्रीरामा पर्धियंती तारकी ॥ १४ ॥
भक्तिभावप्रेमाचा जेथें सुकाळ । अध्यात्मविद्येचा पर्व सर्वकाळ ।
साक्षात्कार अपरोक्षु सुपक्कफळ । भोळेभाविका चारिती ॥ १५ ॥
स्वरूपसांप्रदायी रामदासी । सद्गुरु वोपिते शिष्यजनासी ।
आणिक ऐका हो शिष्यपंडितांसी । कळविले मार्ग समर्थें ॥ १६ ॥
रामनाम येक चि तारकमंत्र । मठ अयोध्या साह्य कपीवर ।
आवाहन विसर्जन दृश्य प्रकार । सारासारविचारणा ॥ १७ ॥
हरि उपास्य मुद्रा अगोचरी । समाधान सिद्धआसनावरी ।
ज्ञान ध्यान वैराग्य कर्मणूकपरी । मूळ साधनाचें गुरुदास्य ॥ १८ ॥
या सांप्रदाईं गुरुदयाघन । महाराज योगी महंत पूर्ण ।
ब्रह्मचारी कटबंद कौपीन । पादुका शोभे पायांत ॥ १९ ॥
संग्रहीं काठी झोळी निशाण । गुरुदत्त हुमुंजी वरप्रावर्ण ।
बटवेंत असती चिजा बहुगुण । उजवे करीं तुळसीजपमाळ ॥ २० ॥

---

१ संतांना मातेची उपमा द्यावी तर. २ बाप. ३ त्यानें ( तृतिया ). ४ आवडती. ५ अंतरांत पाहण्याची धारणा प्रकरणीं जी चौथी मुद्रा ती. ६ श्रेष्ठ प्रतीचें अंगावरील वस्त्र.

ऐसिया परीनें पडोन दृष्टी । काय प्रेरिलें कीं नेणों हृत्पुटीं ।
लागतां पाठीसी रूढली गोष्टी । हा वंशावळीचा ह्मणोनि ॥ २१ ॥
समाधिस्थ होऊनि आपण । नवल हो करिती प्रतिपाळण ।
अधिकारी नव्हे मी अधम पूर्ण । परि मंगळाचरणीं स्तवावें ॥ २२ ॥

॥ श्रीरामसमर्थ जयजयराम ॥

श्लोक ॥ **गणेशः शारदाचैव सद्गुरुस्सज्जनस्तथा ।**
**आराध्यदैवतं गुह्यं सर्वं मे रघुनंदनः ॥**
श्लोक ॥ **आदिनारायणं विष्णुं ब्रह्माणं च वशिष्ठम् ।**
**श्रीरामं मारुतिं वंदे रामदासं जगद्गुरुम् ॥ १ ॥**
श्लोक ॥ **ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिम् ।**
**द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्त्वमस्यादि लक्ष्यम् ।**
**एकं नित्यं विमलमचलं सर्वधीः साक्षिभूतम् ।**
**भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तन्नमामि ॥ १ ॥**

॥ जयजयराम ॥

आतां वंशावळीचें ऐका स्तवन ।
परि गुरु येक मुळींचा शिष्यवर्गजन ।
सेवटशिष्याहून मोजितां अवघेसी गुरुपण ।
एवं गुरुशिष्य चि बहुता मोजितां हि ॥ २३ ॥
जयजयाजी जगज्जीवना । सर्वांतरस्था नित्य निर्गुणा ।
योगीजनवंद्या मनमोहना । **आदिनारायणा** नमोस्तुते ॥ २४ ॥
जयजयाजी वैकुंठवासा । दुष्टसंव्हारा भक्तकोंवसा ।
आनंदकंदा अज अविनाशा । **श्रीविष्णुजी** नमोनमः ॥ २५ ॥
जयजयाजी प्रबोधकर्ता । हृदयनिवासा भेदभयहर्ता ।
जयजयाजी ध्येयध्यानपर्ता । **श्रीहंस** गुरुदाता पाहिमां ॥ २६ ॥
जयजयाजी वेदसारज्ञा । पुराणपुरुषा पुरातना ।
जगदैक्यवंद्या मूळकारणा । जय गुरु **विधाता** प्रणम्य ॥ २७ ॥

---

1 येथून श्रीआत्मारामांनीं आपली गुरुपरंपरा दिली आहे.

जयजयाजी ज्ञानसागरा । मुमुक्षसाधका दाविता थारा ।
अलिप्तदशेचे निजमाहेरा । श्रीवशिष्ठगुरुवरा नमोस्तुते ॥ २८ ॥
जयजयाजी श्रीजगद्गुरुदेवा । अघटितलीळा भक्तविसावा ।
परात्परदाता करुणार्णवा । श्रीजानकीवल्लभा पाहिं पाहीं ॥ २९ ॥
जय अंतरात्मा सिद्धादिसिद्धा । हरसी कृपेनें भ्रामिक बाधा ।
भक्ता सांभाळिसी चतुर्विधा । श्रीमारुतीगुरुवर्या दंडवत ॥ ३० ॥
जय सज्जनगडवासा कैवल्यदाता । सच्चिदानंदा त्रिगुणातीता ।
अपार लीळा अनुपम्य दाविता । श्रीदाससमर्था नमोनमः ॥ ३१ ॥
जयजयाजी श्रीकल्याणराजा । जय विश्वंभरा विश्वबीजा ।
डोंबग्रामवासा नमस्कार माझा । प्रिय वाटो तव स्वामिया ॥ ३२ ॥
जयजयाजी सत्सौख्यदायका । आपचंदनिवासा भक्तजनसखा ।
न कळे तव महिमा ब्रह्मादिका । श्रीशिवरामगुरुराजा वंदन ॥ ३३ ॥
जयजयाजी बोधसमुद्रा । उल्हासविसी भक्तजनचंद्रा ।
जय भावातीता अलक्षयोगेंद्रा । श्रीरामचंद्रगुरुनाथा नमोस्तुते ॥ ३४॥
हे गुरुपरंपरास्तवनगुणें । सद्गति पाविजे कष्टल्याविण ।
धन्य गुरुपुत्र जगीं या पूज्यमान । आतां उत्छावसंज्ञा ऐका हो ॥ ३५ ॥
चैत्री नवमीला श्रीरामजयंती । चैत्र पौर्णिमेला जन्मला मारुती ।
रामदासस्वामींची पुण्यतिथी । माघ वद्य नौमीला होतसे ॥ ३६ ॥
आषाढ शुद्ध त्रयोदशीला । कल्याणस्वामींचा उत्साहसोहळा ।
मार्गशीर्ष शुध्द सप्तमीला । शिवरामस्वामींची आराधना ॥ ३७ ॥
रामचंद्रस्वामींची पुण्यतीथ । चैत्र पूर्णमेला करिती भक्त ।
दिनसंकेत हा भाविकजनांतें । कळविला क्रमयुक्त चालऊं ॥ ३८ ॥
सेवा प्रत्यक्षा करणें उचित । जरि होऊन गुरुस्वामी समाधिस्थ ।
सत्कृपें शिष्याला वोपिल्यां गुरुत्व । साधकत्व शुश्रूषा न सांडिजे ॥३९॥
समाधि पादुका कीं प्रसादातें । प्रत्यक्ष गुरु चि मानिजे त्यांतें ।
गुरुसंततीला लेखावें दैवत । किमपि आदीतें सोडूं नये ॥ ४० ॥

गुरु मेला भावी तो चि मूर्ख । गुरुबांधवा दूषी अभाविक ।
देखोन सत्पात्रा न मानी हरिख । त्यास परमार्थी ह्मणों नये ॥ ४१ ॥
मायामयेचा सरोन गलबला । आत्मा चि अवघा प्रबळोन ठेला ।
ठाव न उरला अशंकेला । हा शक्तिपात यावरी सेवा असे ॥ ४२ ॥
समावेश्य गोष्टींतील निजगोष्टी । गुरुरायें च राहावें जडोन हृत्पुटीं ।
क्रममार्गीं उपजावी प्रीत मोठी । व्हावें प्रेमानें गुरु स्वथा ॥ ४३ ॥
गुरुकृपा व्हावी जालीं लक्षणें । साधनक्रममार्गीं श्रद्धा पूर्ण ।
सित्ध मुक्त आत्मा स्वयें असोन । गुरुदास्यविषईं तत्पर ॥ ४४ ॥
थोर थोर साधनें ते जाले बहुवस । सांग संरक्षण होय कैसें ।
अहो दृढ येक शिष्याला ठसतां विश्वास । या स्वल्पानें सर्व हि कार्यसिद्धि ॥
ह्मणाल प्रचीतीनें हें कथिलें काय । तरि येवढें मज पामरा कैंचें धैर्य ।
समर्थस्वामींचा हा प्रसाद होय । लक्ष द्या तिकडे व्हा सुखी ॥ ४६ ॥
येतां लिहिताना स्वल्प अभिमान । कांहीं च स्फुरेना पुढें लिहिणें ।
तरी कर्ता करविता गुरुवर्य आपण । आत्मारामप्रभु दाता ॥ ४७ ॥
इति श्रीक्रमसारग्रंथीं स्तवननिरूपणन्नाम समास षोडश ॥ १६ ॥
॥ जयजयराम ॥ वोवीसंख्या ॥ ५४८ ॥

REFBK-0001184